# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ४९ // ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ०६/०८/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**०६/०८/२०२१** शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बाविस्कर किशोर रमेश | देशमुख प्रतिभा गजानन |
| सोनवणे मुकुंदा भागवत | काळे रेश्मा कुंदन |
| बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| कोल्हे ललीत विजय | नेरकर सरिता अनंत |
| काळे अमित पांडुरंग | लढढा नितीन बालमुकुंद |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | बरडे नितीन मनोहर |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख सैईदा युसुफ |
| पाटील कुलभुषण विरभान | |

सदर सभेस मा.अतिरिक्त आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, मुख्यलेखा परिक्षक, श्री.संतोष वाहुळे, नगरसचिव ,श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, शाम गोसावी, उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, आजच्या सभेमध्ये सर्वांचे स्वागत आहे. स्थायी समिती सभा क्र.४९ विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.३०/०६/२०२१ व दि.०९/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.३०/०६/२०२१ व दि.०९/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** जळगांव शहरातील सर्व स्मशानभूमी मध्ये मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणेसाठी मृतांचे नातेवाईकांना कमी खर्चामध्ये अंत्यसंस्कार करता यावे याकरिता प्रती मृतदेहासाठी रक्कम रु.१३००/- मध्ये ८ मण लाकुड (वड, पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करण्यासाठी मे.प्रल्हाद शंकर कोळी, रा.आसोदा ता.जि.जळगांव यांना विक्री परवाना देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.सभापती :-** यामध्ये ठेकेदाराला आपण लाकुड आणि गोवऱ्या पुरविण्याचे काम देत आहोत. त्या ठिकाणी मला वाटते, सोबत रॉकेल असेल डिझेल असेल. ते सुध्दा अंतिमसंस्काराला देणे आवश्यक बाब आहे. तर त्यासाठी नागरीकांची ठेकेदाराकडुन पिळवणुक होऊ नये. त्याचीही दक्षता घेण्यात यावी व हा जो कोणी व्यक्ती असेल नागरीक त्याच्यावरती अवलंबुन असेल. त्यांनी संबंधीत ठेकेदाराकडुन रॉकेल डिझेल पुरवुन घ्यायचे की, स्वत: आणायचे.

**श्री.नितीन बरडे :-** रॉकेल बंद केले आहे. राजु भाऊ जळगांव मध्ये मोदी साहेबांनी.

**मा.सभापती :-** भाऊ आता तेथे जी मागणी होती ते सांगत आहे मी तुम्हाला. त्यांच्यावरती हे व्हायला नको की आमच्या कडुनच घ्यावे लागेल. याची काळजी घेण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते तर एच्छिक असेल ना. आपण परवानगी मक्तेदाराला देत आहेत. ते लाकुड आणि गोवऱ्या पुरविण्यासाठी.

**मा.सभापती :-** भाऊ आता जे रु.१३००/- घेणार आहोत. मग त्या डिझेलच्या नावाखाली परत ते २५०० द्या ३००० द्या अशी मागणी होऊ शकते. असे व्हायला नको त्याची आपण काळजी घ्यायला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो पण डिझेल जर कधी वेळोवेळी कोणी नागरीक मागत असेल. आणि ती देणाऱ्याची आणि घेणाऱ्याची जबाबदारी राहील.

**मा.सभापती :-** जे एच्छिक असेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ते एच्छिक असेल.

**नगरसचिव :-** आदरणीय भाऊ, प्रस्ताव मान्य आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो, प्रस्ताव मान्य आहे.

**मा.सभापती :-** मुकुंदा भाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहरातील सर्व स्मशानभूमी मध्ये मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणेसाठी मृतांचे नातेवाईकांना कमी खर्चामध्ये अंत्यसंस्कार करता यावे याकरिता ८ मण लाकुड (वड, पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या कमीत कमी किंमतीत पुरवठा करणाऱ्यास विक्री परवाना देणे कामी महासभा ठराव क्र.४७० दि.१२/०५/२०२१ नुसार मान्यता घेवून दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिर निविदा सूचना जा.क्र.२७३ दि.२३/०६/२०२१ नूसार प्रसिध्द केली असता मुदतीत ५ निविदा फॉर्मची विक्री झालेली आहे.

त्या अनुषंगाने दि.०१/०७/२०२१ पर्यंत ३ फॉर्म प्राप्त झालेले असून प्राप्त तीन्ही दरपत्रक धारक यांना निविदा समिती समोर समक्ष बोलवून त्यांचे समोर दराचा लिफाफा दि.०२/०७/२०२१ रोजी उघडले असता प्राप्त दराचा तुलनात्मक तक्ता पाहता विविदाधारक मे.प्रल्हाद शंकर कोळी,रा.आसोदा ता.जि.जळगांव यांचे शहरातील ४ स्मशानभुमीसाठी ८ मण लाकुड (वड,पिंपह सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या प्रती मृतदेहावर रु.१३००/- सर्वात कमीचे दर प्राप्त झालेले आहे.

मे.प्रल्हाद शंकर कोळी यांना ४ स्मशानभुमी येथे प्रती मृतदेहावर ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणेसाठी व विक्री करणेस निविदा मधील खालील नियम अटीस अधिन राहून परवाना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ) <u>सर्व साधारण अटी व शर्ती</u>

१. सर्वात कमी दरात लाकूड व गोवऱ्या पुरवठा करणाऱ्या मक्तेदारास मनपाकडून विक्री परवाना देण्यात येईल.

२. मनपा मार्फत सदर मक्तेदाराला सर्व स्मशानभूमींमध्ये १५ X ३० स्क्वे.फुट मोफत जागा देण्यात येईल. तसेच तेथे शेड उभारण्याची परवानगी देण्यात येईल.

३. कमीत कमी दरात लाकूड व गोवऱ्या विक्री करणाऱ्या पुरवठादाराची नेमणुक नागरिकांची सोय म्हणुन करण्यात येत आहे. सदर पुरवठादाराकडूनच सदरचे साहित्य खरेदी करण्याची

नागरिकांना सक्ती असणार नाही. नागरिक आपल्या सोयीप्रमाणे इतर ठिकाणांहूनही साहित्य उपलब्ध करुन घेवू शकतील.

४. सदर परवाना १ वर्ष कालावधीसाठी मर्यादित राहील.

५. १ वर्षानंतर मक्तेदारास मनपाने दिलेली जागा खाली करुन मनपाच्या ताब्यात देणे बंधनकारक राहील.

६. मक्तेदारास सदर जागेवर कोणत्याही प्रकारे मालकी/भाडेपट्टा हक्क सांगता येणार नाही.

७. म.न.पा.ने मान्य केलेल्या दराप्रमाणे साहित्य पुररवठा करणे बंधनकारक असेल.

८. साहित्य पुरवठाचे देयक संबंधीत मृत व्यक्तींचे नातेवाईक यांचेकडून अदा करण्यात येईल. त्याची जबाबदारी महापालिकेची असणार नाही.

९. परवाना देणेपुर्वी रक्कम रु.४८,०००/- सुरक्षा अनामत भरणे आवश्यक आहे.

मे.प्रल्हाद शंकर कोळी,रा.आसोदा ता.जि.जळगांव यांना मनपा मार्फत सदर मक्तेदाराला नेरी नाका, मेहरुण, पिंप्राळा, शिवाजी नगर या स्मशानभुमीमध्ये १५X३० स्क्वे.फुट मोफत जागा देणे व रु.१,३००/- प्रती मृतदेहावर ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणेस व विक्री परवाना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करून कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव :- विषय क्र. ३:-** जळगांव महानगरपालिका अंतर्गत म.न.पा.चे विविध ठिकाणचे कोविड-१९ साठीचे सी.सी.सी. व क्वॉरटाईन सेंटर येथील शौचालय, मुताऱ्या, रुम पॅसेज, परिसर स्वच्छ करणे व या ठिकाणी औषधी फवारणी करणे कामी दैनंदिन ४५० (आवश्यकतेप्रमाणे) कामगारांचा पुरवठा करणे कामी मे.दिपक उत्तराधी, अमरावती यांना मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-** उज्वलाताई.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हा तहकुब ठेवलेला विषय होता. त्यांनी परत निविदा करावी. परत परत मंजुरी देण्यापेक्षा परत निविदा करावी.ऐवढे म्हणणे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परत निविदा करण्याची संपुर्णत: जबाबदारी प्रशासनाची आहे. आपण प्रत्येक वेळी वारंवार प्रशासनाला सुचना करत होतो की, ज्या मक्त्याची मुदत संपुष्टात येते. त्याच्या निदान कमीत कमी एक ते दिड महिन्यापुर्वी नव्याने निविदा प्रक्रिया सुरु करण्यासंदर्भातली भुमिका प्रशासनाने आग्रहाने राबवायला पाहिजे. परंतु प्रत्येक वेळेला हीच परिस्थिती निर्माण होते. प्रशासन या विषयावर गंभिर का राहत नाही. मात्र हे कळत नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला ताई.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** जसे नितीन भाऊनी म्हटले, प्रशासनाची जबाबदारी आहे ही, आपल्याला पण मान्य आहे की, प्रशासनाची जबाबदारी आहे. पण दिरंगाई प्रशासन का करतो. आयुक्त साहेबांची सही असते, जेव्हा अजेंडा येतो, जेव्हा प्रोसिडींग होते. त्याच्यावर आयुक्त साहेबांची सही असते. लेखाधिकाऱ्यांची सही असते. सगळया अधिकाऱ्यांची सही प्रोसिडींगवर असते. मग त्यांना तेव्हा कळत नाही का ? हा विषय आहे तर याला किती तारखेपर्यंत मंजुरी होती. किती तारखेपर्यंत यांचाकालावधी संपलेला आहे. मग हे प्रशासनाला कळत नाही का इतके दिवस उशीर का होतो. प्रशासन का दिरंगाई करत आहे. याला जबाबदार आयुक्त साहेब पण तितकेच आहे. ठोस काही तरी कार्यवाही झालीच पाहिजे. आपण खालच्या अधिकाऱ्यांना म्हणतो प्रत्येक वेळेला की, खालचे

अधिकारी दिरंगाई करत आहे. पण जेव्हा विषय मंजुरीला येतो. किंवा हा जो कर्मचारी पुरविण्याचा विषय आहे. हे तर माहित आहे की, कधी संपला आहे कालावधी. जेव्हा विषय अजेंडयावर घ्यायचा असतो तेव्हा आयुक्तांची सही असते त्याच्यावर. नितीन भाऊ बरोबर आहे ना माझे म्हणणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे, बरोबर आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मग आयुक्तांना कळत नाही का ? हा विषय का उशिर झाला. ते सही कसे करतात. सभापती महोदय, आपण ठोस काही तरी आयुक्तांना आदेश करावे. असे विषय वारंवार येऊ नये. आपण तर संमती देतात. आपले काय काम आहे फक्त हो किंवा नाही. संमती देणे पण बाकी कार्यवाही करणे हे सर्व प्रशासनाचे अधिकार आहे ना. मग प्रत्येक वेळी आपल्यालाच बोलावे लागते. प्रशासन फक्त हातावर हात धरुन बसलेला आहे. फक्त आपण ओरडायचे पुढे काहीच कार्यवाही होत नाही.

**मा.सभापती :-** आवाज येत आहे ताई.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो.

**मा.सभापती :-** आवाज येत आहे ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो येत आहे.

**मा.सभापती :-** संबंधीत ठेकेदाराची मुदत मला वाटते फेब्रुवारी महिन्यातच संपलेली आहे. त्यांना आपण १ मार्च ते १ मे २०२१ पर्यंत त्यांना ऑलरेडी मुदतवाढ दिलेली आहे. आणि ती मुदतवाढ ही मागच्या महिन्यात संपुन गेलेली आहे. आणि वारंवार सांगुन ही प्रस्ताव प्रशासनाकडुन उशीरा येत असतात. कायम दप्तर दिरंगाई आपल्याकडे होत असते. आणि हा विषय तसाच झालेला आहे. म्हणुन मी आयुक्त महोदयांना सुचना करेल की, त्यांनी जो कोणी दप्तर दिरंगाई केलेली असेल. हलगर्जीपणा केला असेल. या सर्वांना नोटीसा काढण्यात याव्या. आणि त्यांचे लेखी उत्तर घेण्यात यावे. आणि जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** आणि सदरच्या ठेकेदाराला मुदतवाढ न देता, आपण नविन टेन्डर प्रोसेस जी आहे. तीच राबवावी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, मला बालायचे आहे सभापती महोदय,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**श्री.कुलभुषण पाटील :-** ताई तुम्ही बोलुन घ्या मग मी बोलतो.

**मा.सभापती :-** निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**श्री.कुलभुषण पाटील :-** या विषयावर मला बोलायचे आहे सभापती महोदय,

**मा.सभापती :-** एक मिनीट ताई, बोला, कुलभुषण भाऊ बोला,

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, मला असे वाटते की, निविदा प्रक्रिया नव्याने जरी राबविली तरी हरकत नाही. परंतु आपण याच्यामध्ये मिनीमम वेजेसचा जर विचार केला तर जो कोणी संबंधीत ठेकेदार आहे तो ज्या पध्दतीने काम करतो आहे आपण नविन निविदा प्रक्रिया राबविले नंतर, त्याच्यामध्ये आपले महानगरपालिकेचा जो काही आर्थिक बोझा आपल्यावरती आहे. त्या आर्थिक बोझ्यामध्ये अजुन भर पडणार आहे. कारण की संबंधीत ठेकेदार हा काही पॉईंट अबो परसेंटेजने काम करत आहे. मिनीमम वेजेसच्या पॉईंट एक परसेंटने काम करत आहे. याच्यानंतर निविदा प्रक्रिया राबविले नंतर, नक्कीच मिनीमम वेजेसपेक्षा कमी पैश्यात म्हणजे याच्यापेक्षा कमी पैश्यांमध्ये कायद्यानुसार आपण संबंधीत ठेकेदाराला काम सुध्दा देऊ शकत नाही. तर मला असे वाटते की, नव्याने निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर याच्या मध्ये फक्त आणि फक्त महानगरपालिकेचे आर्थिक नुकसानच होणार आहे. जर आपण व्यवस्थीत डॉकेट वाचले असेल डॉकेटचा अभ्यास केला असेल. तर मला असे वाटते की, तो फक्त पॉईंट एक पैश्याने, पॉईंट एक पैसा म्हणजे हा नाहीच्या बरोबर आहे. जर याच्यानंतर आपण निविदा प्रक्रिया मागविली. आणि निविदा प्रक्रियेत जर आपण रेट बघितले, तर मला असे वाटते की, याच्यापेक्षा आपल्याला जास्त पैसे मोजावे लागतील. आणि ज्याला मुदतवाढ देण्याच्या संदर्भातला हा प्रस्ताव आहे. ही कायदेशीर प्रक्रिया मला असे वाटते, संबंधीत अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही कारण की, मी डॉकेट बघितले, डॉकेट मध्ये ५२९.१ प्रती दिन प्रती कामगार या सेवा आपण ६ महिन्याकरीता आपण ६ कोटी २८ लाख मध्ये दिलेले होते. आणि त्याचे हे सर्व काम करत असतांना स्वत: महापालिका प्रशासन कमी पडलेले काम करुन घेण्यामध्ये, त्याला आपण जितके लोकांचे काम दिलेले होते तितके लोकांचा काम न करता

आपल्याला जितके आवश्यक आहे तितके लोकांच काम करुन घेतो आहे. तर मला वाटते की, संबंधीत ठेकेदारावर अन्याय झाले सारखे होईल किंवा जर पुढे भविष्यामध्ये असे करत गेलो तर प्रशासनमार्फत आपल्यामार्फत तर कोणीही ठेकेदार काम करायला तयार होणार नाही.

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ ,

**श्री.कुलभुषण पाटील :-** ऐका ना,

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ तुम्ही जे सांगत आहे की, कमी रेट मध्ये करत आहे. तर आपण निविदा सर्वांसाठी खुली ठेवलेली आहे, भरु द्या त्यांना टेन्डर, येऊ द्या ना त्यांना भरतील ते टेन्डर परत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** राजु भाऊ तुम्ही एकदा डॉकेट व्यवस्थीत वाचा तर तुमच्या लक्षात येईल. तुम्ही वाचले नाही बहुतेक म्हणुन तुमच्या लक्षात नाही येत.

**मा.सभापती :-** मला सांगा वर्षानुवर्ष याच ठेकेदाराला काम द्यायचे ठरविले आहे का आपण.

**श्री.कुलभुषण पाटील :-** वॉटरग्रेसचे पण तसेच केले होते ना आपल्या तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी. एकमुस्त ठेका देऊन काय केले होते आपण.

**मा.सभापती :-** टाईम लिमीट दिलेली आहे ना त्यांना ही. यांना ही टाईम लिमिट दिला होता यांचा टाईम लिमिट संपलेला आहे. त्याच्यावरती आपण ३ महिन्याची मुदतवाढ दिली ती ही संपुन आता महिना झालेला आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** माझे प्रशासनाला विचारने आहे की, याला मुदतवाढ देणे योग्य होईल का ?

**मा.सभापती :-** महिना नाही, दोन महिने झालेले आहे ऑलरेडी, आणि आपण तो विषय मागच्या वेळेस तहकुब ठेवायला लावलेला होता. आता त्याला दोन महिने निघुन गेलेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपण नविन निविदा प्रक्रिया राबविणे योग्य होईल.

**मा.सभापती :-** संबंधीत ठेकेदाराला लाभ व्हावा अश्या पध्दतीने आपण काम करत आहोत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, मला प्रशासनाला विचारायचे आहे की, याच्यामध्ये नविन निविदा प्रक्रिया करणे योग्य होईल का ? प्रशासनाने याच्यावर उत्तर द्यावे.

**मा.सहा.आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.पवन पाटील :-** ही जी निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे ना असे काही रेग्युलर निविदा प्रक्रिया नाही. ती कोविडची परिस्थिती पाहुन आपण ही निविदा प्रक्रिया केली होती. ती निविदा प्रक्रिया करतांना आपण असा अंदाज व्यक्त केला होता की, पहिली लाट जी होती कोविडची ती ६ महिन्यातच संपुष्टात येईल. म्हणुन आपण तो सहा महिन्याचा केला होता. सहा महिन्याची मुदत दिली होती त्या कामासाठी, परंतु कोविड कन्टीन्यु राहिला. दुसऱ्यांदा जेव्हा मुदतवाढ देण्याचा विषय आला, तेव्हा दुसरी लाट चालु होती. तेव्हा नविन निविदा प्रक्रिया करणे हे काही उचित नव्हते तेव्हा. आणि तिसऱ्यांदा जर स्थायी समितीने निर्णय घेतला की, नविन निविदा प्रक्रिया करे पर्यंत हे चालु ठेवा तर याला काही हरकत नाही. आणि हा जो मुदतवाढीचा जो विषय होता असे काही रेग्युलर निविदा नसल्यामुळे हा विषय आलेला आहे, यात असे दिरंगाईचा काही प्रश्न येत नाही. कारण कोविडचा प्रश्न आहे, कोविडच्या कामाला लाट कन्टीनीव्ह असल्यामुळे आपल्याला ते मध्येच खंडीत करता येत नव्हते म्हणुन आपण मुदतवाढ ठेवलेली होती. स्टॅण्डींगने जर निर्णय घेतला तर करता येईल.

**मा.सभापती :-** ठिक आहे नविन निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

**श्री.नितीन लढढा :-** पण साहेब, तोपर्यंत तर मुदतवाढ द्यावी लागेल ना.

**मा.सभापती :-** भाऊ त्यासाठी आपण कायम मुदतवाढ देत आलेलो आहे आताही द्यावी लागेल, पण त्याच्यासाठी काही तरी टाईमींगची मर्यादा बांधुन दिली गेली पाहिजे की, किती दिवसात निविदा प्रक्रिया राबविली जाईल.

**मा.सहा.आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.पवन पाटील :-** निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत द्या. मक्तेदार मिळाला नाही याला काही बंधन असते ना.

**मा.सभापती :-** नाही नाही तुमच्याकडुन टेन्डर प्रोसेस किती दिवसात होऊ शकते.

**मा.सहा.आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.पवन पाटील :-** ठराव आमच्या हातात आला की, आम्ही लगेच चालु करुन देऊ. नविन टेन्डर प्रोसेस चालु करुन देऊ.

**मा.सभापती :-** हे बघा मागचे ही डॉकेट आहे. याला एक महिन्याचा प्रवास झालेला आहे. संबंधीत विभागाकडुन शेवटची सही होईपर्यंत किती दिवस गेलेले आहे. एक महिन्याचा प्रवास झालेला आहे त्या डॉकेटचा.

**मा.सहा.आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.पवन पाटील :-** जो नियमीत वेळ लागेल त्याच्याप्रमाणेच सर्व प्रोसेस करण्यात आलेली आहे.

**मा.सभापती :-** तरी साधारण किती दिवस लागतील.

**मा.सहा.आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.पवन पाटील :-** साधारणता दिड महिना तरी लागेल टेन्डर प्रोसेस करायला.

**मा.सभापती :-** दिड महिना मुदतवाढ देण्यात येत आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हॅलो, असे मोघम स्वरुपात नाही. जोपर्यंत ही निविदा प्रक्रिया होऊन जात नाही तो पर्यंत किंवा जोपर्यंत सर्व निविदा मागविल्या जात नाही.

**श्री.नितीन लढढा :-** काय होते राजु भाऊ, दिड महिना जर तुम्ही मर्यादीत मुदतवाढ दिली. दिड महिन्यापर्यंत नाही झाले, दोन चार आठ दिवस उशिर झाले. तर पुन्हा ते स्थायी समिती समोर येण्याची आवश्यकता नाही.

**मा.सहा.आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.पवन पाटील :-** निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत.

**श्री.नितीन लढढा :-** निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** संबंधीत अधिकाऱ्यांचा अभिप्राय घ्या.

**मा.सभापती :-** भाऊ आपल्याकडे, ऐका ना, सिक्युरिटीचा विषय डिसेंबरमध्ये झालेला आहे निविदा प्रक्रिया स्थायीच्या समोर विषय किती महिन्याने आला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सर्वांचे याच्यावर एक मत असे आहे.

**मा.सभापती :-** याला अजुन सहा महिने आठ महिने घालुन देतील.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ते वर्ष घालऊ द्या प्रशासनाला, तुम्ही सभापती आहे ना,

**मा.सभापती :-** असे व्हायला नको ना, काही तरी काल मर्यादा आखुन दिली पाहिजे ना प्रशासनाला.

**श्री.नितीन लढढा :-** राजु भाऊ आपण सभापती आहात, आपण सातत्याने या गोष्टींचा पाठपुरावा करणे अपेक्षित आहे.

**मा.सभापती :-** बघा, आता पाठपुरावा करतो आहे तर तुम्ही करु देत नाही.

**श्री.नितीन लढढा :-** आम्ही तुम्हाला कुठेही तुमच्या कार्यपध्दतीमध्ये अटकाव करत नाही. आमची तर नेहमी ही मागणी असते की, प्रशासनाने त्यांच्या कर्तव्याचे पालन वेळेमध्ये केलेच पाहिजे. ही आजपासुन नाही आमची सातत्याने मागणी आहे. परंतु प्रशासन दिरंगाई करत असतांना पदाधिकाऱ्यांचा त्याच्यावर कुठेतरी अंकुश असायला हवे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, आपण पहिल्याचे जर प्रोसिडींग पाहिले तर आम्ही सतत या विषयावर बोंब मारत आहे की, प्रशासन या बाबतीमध्ये निष्काळजीपणाने काम करतो म्हणुन नितीन भाऊ जास्त वेळ बोललेले आहे किंवा आम्ही जास्त वेळ बोललेले आहे. चला तो विषय ठिक आहे जाऊ द्या पण याच्यामध्ये सदरील प्रशासनाचा योग्य तो अभिप्राय येत नाही तोपर्यंत ही मुदतवाढ देऊन सदरील निविदा प्रक्रिया नव्याने करण्यात येऊ नये.

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ, आवाज क्लियर येत नाही आहे तुमचा. तुमच्या नेटवर्कला प्रॉब्लेम आहे, आवाज येत नाही बरोबर.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता क्लियर येतो आहे का ?

**मा.सभापती :-** हो बोला,

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदरील प्रक्रियेमध्ये संबंधीत अधिकाऱ्यांचे योग्य ते अभिप्राय येत नाही, कायदेशीर अभिप्राय येत नाही तो पर्यंत सदरील प्रक्रियेला मुदतवाढ देऊन सदरील प्रक्रिया योग्य पध्दतीने चालु आहे असे निर्दशनास आले तर मुदतवाढ द्यावी अन्यथा नविन टेन्डर करण्यास हरकत नाही. परंतु संबंधीत अधिकाऱ्यांचे योग्य ते अभिप्राय योग्य त्या टिप्पण्या आल्याच पाहिजे. याबाबत विचार करण्यात यावा.

**मा.सभापती :-** कुठले अभिप्राय ?

**श्री.कुलभुषण पाटील :-** सर्व अधिकाऱ्यांचे या प्रकरणाबद्दल अधिकाऱ्यांचे अभिप्राय येणे गरजेचे आहे ना. योग्य की अयोग्य मुदतवाढ देण्यात आली कायदेशीर आहे की नाही.

**मा.सभापती :-** त्यांची ऑलरेडी मुदत संपलेली आहे, अभिप्रायचा विषय कुठुन येतो. संबंधीत ठेकेदाराची मुदत संपलेली आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** कोणी दुसरा ठेकेदार पैश्यांशिवाय काम करु शकतो का माझे म्हणणे इतकेच आहे.

**मा.सभापती :-** लवकरात लवकर निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. तो पर्यंत मुदतवाढ द्यावी.

**नगरसचिव :-** सर्वानुमते आहे ना हा विषय, आदरणीय भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो सर्वानुमते आहे.

**नगरसचिव :-** जो पर्यंत निविदा प्रक्रिया पुर्ण होत नाही तो पर्यंत मुदतवाढ.

**श्री.नितीन बरडे :-** हो हो. माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनाने जळगांव महानगरपालिका अंतर्गत म.न.पा.चे विविध ठिकाणचे कोविड-१९ साठीचे सी.सी.सी. व क्वॉरटाईन सेंटर येथील शौचालय, मुताऱ्या, रुम पॅसेज, परिसर स्वच्छ करणे व या ठिकाणी औषधी फवारणी करणे कामी दैनंदिन ४५० (आवश्यकतेप्रमाणे) कामगारांचा पुरवठा करणे कामी निविन निविदा प्रक्रिया राबवावी व सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो सदर कामी मक्तेदार मे.दिपक उत्तराधी, अमरावती यांना मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव :- विषय क्र.** ४:- जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १. श्री.नंदु शहादु नाडे २. श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदय, या दोन्ही कर्मचाऱ्याबाबतीत आपण अनेक वेळा प्रशासनाला या संदर्भात विनंती केलेली आहे की, या दोघी कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्याच्या संदर्भातला विषय आलेला होता. अनेक वर्षापासुन मृत्यु पावलेले जनावरे उचलण्याच काम हे दोघी कर्मचारी अत्यंत प्रामाणिकपणे करत आहे. वास्तविक बघितले तर अत्यंत घाणेरडया स्वरुपाचे हे काम आहे. साधारणता कुठलाही कर्मचारी या पध्दतीचे काम करायला पुढे येत नाही. परंतु सातत्याने मानधनावरती, ही मंडळी बिचारी प्रत्येक नविन निवडुन आलेल्या पदाधिकाऱ्यापासुन प्रत्येक सदस्यापर्यंत सातत्याने त्यांची ही मागणी असते. आम्हाला सेवे मध्ये कायम करण्याबद्दलचा निर्णय घ्या. आपण त्या संदर्भात अनेक वेळा तसे ठराव ही केलेले आहे. नेमके आज आयुक्त नसतांना बसलेल्या मॅडम जे आहेत. त्यांच्याकडे तसा ही अस्थापनाचा चार्ज असल्या कारणाने या विषयासंदर्भात त्यांनी तशी माहिती या सभागृहाला अवगत करावी.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** आदरणीय सभापती महोदय आणि आदरणीय सभागृह, जेव्हा आपण शासनाला मानधनावरचे कर्मचारी किंवा रोजंदारी वरचे कर्मचारी हे कायम करण्यासाठी पाठवितो. त्यांचा पहिला मुळातच प्रश्न हा आहे की, त्यांची नियुक्ती विहित पध्दतीने झालेली आहे किंवा नाही. असे जेव्हा नसेल तेव्हा आपला हा प्रस्ताव मान्य होत नाही. त्यामुळे असे प्रस्ताव मान्य होत नाही. तरी त्यांची नियुक्ती होत असतांना जाहिरात दिलेली आहे का ? मुलाखत घेतलेली आहे का ? किंवा निवड मंडळाने त्याची नियुक्ती केलेली आहे का ? याबाबी जर पुर्ण असतील तरच आपण कर्मचारी कायम करण्यासंदर्भात प्रस्ताव पाठवु शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु मॅडम आता आपण जो आकृतीबंध पाठविणार आहोत. त्या आकृतीबंधामध्ये अश्या पध्दतीची पदनिर्मिती करण्यात आलेली आहे का ?

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** यस यस, केलेली आहे सर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** केलेली आहे, परंतु कसे आहे आपला आकृतीबंध मंजुर होऊन येईल. आणि तो पर्यंत हे कर्मचारी ऐजबार होऊन जातील.म्हणजे जर पुन्हा अश्या पध्दतीने रितसर आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर या पदांच्या संदर्भातील जाहिरात ही काढली तरी यांचे वयोमानाप्रमाणे हे त्याच्यामध्ये पात्र राहणार नाही अशी परिस्थिती निर्माण होईल. मग अश्या परिस्थिती मध्ये त्यांच्यावर अन्याय होण्यासारखे होईल ना.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** आपले म्हणणे बरोबर आहे सर परंतु आपल्या ठरावाच्या अनुषंगाने पुन्हा आपण राज्य शासनाला हा प्रस्ताव पाठवु , राज्य शासन तोच प्रश्न विचारेल आपल्याला की, यांची विहित पध्दतीने नियुक्ती

झालेली आहे का ? त्यामुळे तो पुन्हा त्रृटीमुळे तसाच पडुन राहिल. आपण प्रयत्न करु या सर कारण हे अधिकार राज्य शासनाला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे मॅडम परंतु बघा, अत्यंत प्रामाणिकपणे काम करणारे हे दोघी कर्मचारी आपण यांना आज १४,०००/- प्रती महा मानधन देतो, मला एक सांगा आपल्या कायमस्वरुपी असलेल्या आरोग्याच्या कर्मचाऱ्याला वेतन किती येतो महिन्याला.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** जवळपास ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो, हॅलो,

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** हॅलो,

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो, हॅलो, आवाज येत नाही मॅडम तुमचा.हॅलो हॅलो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ आवाज बंद झाला आहे मला वाटते काही तरी टेक्नीकल प्रॉब्लेम झाला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आवाज येत नाही.

**मा.सभापती :-** हो येत आहे आवाज.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता येतो आहे.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** सर आपण एकदा राज्य शासनाला प्रस्ताव पाठवु या. मग त्यानंतर पुढे पाहु काय म्हणतात ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो पण आपण कायम कर्मचाऱ्यांना किती पगार देतो.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** सर २० ते २५ हजारापर्यंत जातो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता मला सांगा की, शासनच म्हणते न्यायच म्हणतो की, समान काम समान वेतन मग समान काम समान वेतनच्या तुलनेमध्ये जर कधी बघितले, तर आज वेतनाच्या बाबतीत सुध्दा या कर्मचाऱ्यांवर अन्याय होतांना दिसतो.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** सर, हे आपल्या लक्षात आल्यामुळे आपण आकृतीबंधामध्ये सुध्दा मेलेली जनावरे उचलणारी पदे वेगळी ठेवली, सफाई कामगारांची वेगळी ठेवली, आणि एकदा मी या दोघांचीही फाईल बघुन घेते की, जाहिरात वगैरे दिलेली होती का ? कारण आपण असे एखाद्या व्यक्तीला अशी डायरेक्ट ऑर्डर नाही देऊ शकत. त्यामुळे आपल्याला त्यांना कायम नाही करता येत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु मा.सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, समान काम समान वेतन या धोरणाच्या अनुषंगाने पुढच्या स्थायी समिती समोर या दोघी कर्मचाऱ्यांच्या समान काम समान वेतनच्या संदर्भात प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा. जेणे करुन कमीत कमी हे कर्मचारी कायम होणार नाही. परंतु कमीत कमी त्यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला तरी मिळणे अपेक्षित आहे. आज मला सांगा की, इतक घाणेरडे काम १४ हजार रुपये महिना म्हटल तर ४००-४५० रुपये प्रति दिवस आहे. आणि ४२५ रु प्रति दिवस मध्ये अश्या पध्दतीचे काम त्यांच्याकडुन करुन घेणे हे मला वाटते की, त्यांच्यावर कुठेतरी अन्यायाची भावना निर्माण होते. तर या दृष्टीकोणातुन पुढच्या स्थायी समिती समोर या दोघी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत समान काम समान वेतन या धोरणाच्या अनुषंगाने त्यांना योग्य मानधन देता येईल अश्या पध्दतीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**मा.सभापती :-** नक्कीच आपण सुचविल्याप्रमाणे होईल. मला वाटते जवळ जवळ ६ ते ७ ज्या सभा झाल्या. त्याच्यामध्ये वारंवार हा विषय आलेला आहे. आपण मांडतो येथे विषय परंतु त्याची अंमलबजावणी होतांना दिसत नाही. आपण पुढच्या सभेमध्ये याच्या बाबत पुर्ण माहिती घेऊ या आणि प्रशासनाकडुन जो प्रस्ताव शासनाकडे पाठवायचा आहे त्याच्यासाठी आपण सर्वे मिळुन पाठपुरावा करु या. तसेच आपण मागे या दोन कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त आणखी दोन ते तिन कामगारांची नविन नियुक्ती व्हावी अशी मागणी प्रशासनाकडे केलेली होती. आपल्याकडे मला वाटते दोन ते तीन अर्ज पण आलेले आहे. त्याची संबंधीत अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या दोघी कर्मचाऱ्यांची मुदत २७/०८/२०२१ ला संपुष्टात येईल. त्यापुर्वीच प्रशासनाने प्रस्ताव सादर करावा. जेणे करुन पुन्हा ती चर्चा होणार नाही की, विहित मुदतीत प्रस्ताव प्रशासनाकडुन आला नाही.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** माहिती घेऊन सांगते, कारण आता विचारलेला विषय आहे त्यामुळे मला माहित नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरं, सभापती महोदय,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय, मला प्रश्न विचारायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक मिनीट नवनाथ भाऊ एकच मिनीट, आस्थापनाच्या अनुषंगाने विषय आहे. सभापती महोदय आपल्याला उद्देशुन मॅडम यांना विचारु ईच्छितो की, अनुकंपाच्या बाबतीतले जे धोरण आहे. त्याच्या संदर्भातली नेमकी आजची परिस्थिती काय आहे ?

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** आदरणीय सभापती सर, आदरणीय सभागृह, अनुकंपाच्या अनुषंगाने आपण सर्व अर्जदारांचे अर्ज तपासले आपण, त्या अनुषंगाने अगोदर माझ्या अध्यक्षते खाली मुलेप आणि मुख्य अकाऊंट ऑफिसर यांच्या समितीने अहवाल दिलेला होता की, यांचे कोणतेही कागदपत्र दिसुन येत नाही. त्यांचे सर्वांचे आम्ही सर्व्हीस पुस्तक बघितले, तर त्यामध्ये सुध्दा त्यांचे विहित कालावधीत विहित पध्दतीने नियुक्त झालेलेचे कोणतेही पुरावे त्यांच्या सर्व्हिस बुकला सुध्दा नाही. तर या अनुषंगाने मा.महापौर मॅडम आणि मा.उपमहापौर साहेब यांच्याकडे ही बैठक झाली, आयुक्त साहेब ही त्याला उपस्थित होते. त्यानंतर असे ठरले की, किमान जेविहित पध्दतीने भरतीत बसत आहे.अश्यांची स्क्रुटनी करावी त्यामध्ये किती निघत आहे. त्या अनुषंगाने दोन शिक्षकांची नियुक्ती करुन आपण त्यांची तपासणी केली त्यांनी त्यांचा अहवाल दिलेला आहे. याच दरम्यान आपल्याला आपल्या लेखा परिक्षणाचा अहवाल देखील प्राप्त झालेला आहे. लेखा परिक्षणाच्या अहवालामध्ये ज्यांची नावे आहे. आणि या व्यतिरिक्त आपल्याकडे ज्यांचे अर्ज प्राप्त आहे. त्या सगळयांची पुनश्च: एकदा तपासणी केली. तर जवळपास तिसऱ्या पिढीला आपण अनुकंप दिलेली आहे. म्हणुन मागची समजा दुसरी पिढी समजा विहित पध्दतीने नाही कदाचित आपण असे म्हणु शकणार नाही. या अनुषंगाने काही स्क्रुटनी केली. तर १० ते १५ अंदाजित अर्जदार बसु शकता. परंतु पुन्हा यामध्ये हा मुद्दा येतो आहे की, बिंदुनामावलीच्या अनुषंगाने मागे कधीही भरती झालेली नाही किंवा बिंदुनामावलीच्या अनुषंगाने या अर्जदारांची तपासणी करायची राहिलेली आहे. तर या अनुषंगाने २०११ मध्ये आपण बिंदुनामावली तपासली होती. ते मागचे रजिष्टर तपासुन आम्ही आता त्या मागच्या रजिष्टरच्या तपासणीच्या अनुषंगाने किती पदे रिक्त आहे. कोणती कॅटेगिरीचे किती पदे रिक्त आहे. हे आपण काढत आहे. आणि त्या अनुषंगाने या अनुकंपातले त्या त्या बिंदु नामावली आपल्याला बसविता येतील का ? या अनुषंगाने आपण प्रयत्न करत आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु साधारणता याला किती कालावधी लागेल अजुन

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** सर डिसिजन ॲक्च्युल आयुक्त साहेब आले की आम्ही तुम्हाला सांगु शकु की, किती दिवसात होईल. सर येईपर्यंत आम्ही मागचे रजिष्टर तपासुन बिंदु नामावली ती व्यक्ती बसविण्याच एक रफ वर्क करुन मा.आयुक्त साहेब आले की, आम्ही त्यांना दाखवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे कमीत कमी जे जे यासाठी पात्र होतील कमीत कमी तेवढया पात्र व्यक्तींना न्याय मिळाला तरी त्यांचे समाधान होईल. उर्वरितांना न्याय मिळत नसेल. तर त्यांना कमीत कमी न्यायालयात जाण्याचा मार्ग तरी मोकळा होईल. परंतु आज परिस्थिती अशी आहे की, ते न्यायालयात ही दाद मागु शकत नाही. शासन निर्णय घेत नाही आपण निर्णय घेत नाही. अश्या कुंठीत अवस्थेमध्ये अश्या पध्दतीने ते लाभार्थी बिचारे सातत्याने पदाधिकारी आणि प्रशासनाचे खेटया मारत असतात.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** सर पुढच्या १५ दिवसात पिक्चर क्लियर होईल की, किती लोकं पात्र होतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण त्यांना याचा अहवाल दिलेला आहे का त्यांच्या मागणीनुसार,

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** तपासणी अहवाल नाही दिलेला सर त्यांनी सर्व्हीस बुकची मागणी केलेली होती. सर्व्हीसबुक दिलेला आहे. तपासणी अहवाल जर त्यांनी मागितला तर आपण देऊ त्यांना काही प्रॉब्लेम नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही, सातत्याने ते मागणी करतच आहे ना आपल्याकडे. मी मागे लक्ष्मण सपकाळेंशीही बोललो अधिक्षकांशी. आणि त्या वेळेला वाटते आपण अमळनेरला गेला होतात.त्यांनी सांगितले मला की, मॅडम अमळनेरला गेले आहेत. ते आले की, सोमवारी देतो आणि त्या गोष्टीला सुध्दा जवळपास १५ दिवसाचा कालावधी झाला आहे.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** सर आठवडयातुन २ ते ३ वेळा मला ते मुले भेटायला येतात. त्यांनी अहवाल मागितला तर मी देऊन टाकते. त्यांनी मला सर्व्हीस बुक मागितले ते दिले मी त्यांना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांच्या कमीत कमी जेवढया मागण्या असतील ना ते त्यांना पुरवा.जेणे करुन त्यांचे जे काही पर्यायी मार्ग असेल ते त्यांना शोधायला बरे पडेल.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** चालेल ओके.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** सन्मा.सभागृह, आपला हा विषय मंजुर करायचा राहिलेला आहे अजुन आपली अवांतर चर्चा झाली, परंतु हे जे दोन कामगार आहे. यांचा मुदतवाढीचा विषय आपला राहिलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, कसे आहे. आता त्यांची जी मुदत २८ तारखेपर्यंत अजुन आहे ती. साधारणता दि.२७/०८/२०२१ पर्यंत त्यांना मुदत त्यांची अजुन वैध आहे. याच अनुषंगाने आपण म्हणतो आहे की, २७ तारखेच्या पुर्वी स्थायी समिती समोर त्यांना समान काम समान वेतन या धोरणाच्या अनुषंगाने प्रशासनाने प्रस्ताव सादर करावा. जेणे करुन त्याच्यावर स्थायी समिती योग्य तो निर्णय घेऊन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करेल.

**मा.सभापती :-** ठिक आहे, तहकुब ठेवायचा हा विषय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मला बोलायचे आहे सभापती साहेब,

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, मला अनुकंपा धारकांच्या विषयाच्या बाबतीत बोलायचे आहे. मला प्रशासनाला विचारायचे आहे. आपण २०११ मध्ये २०१६ मध्ये २०१७ मध्ये ज्या अनुकंपधारकांना नियुक्त्या दिल्या. त्या कोणत्या निकषाखाली दिलेल्या आहे. त्यांना नियुक्त्या देत असतांना कोणते निकष तपासले गेले होते.

**मा.सभापती :-** कुठल्या नियुक्त्या.

**श्री.कुलभुषण पाटील :-** अनुकंपा धारकांना २०१६ मध्ये २०१७ मध्ये २०१२ मध्ये ज्या वेळोवेळी अनुकंप धारकांना आपण सेवेत समावुन घेतलेले आहे. त्याच्यासाठी कोणते निकष लागु होते. आणि या अनुकंपधारकांसाठी आपण कोणत्या निकषच्या अनुषंगाने काम करत आहे. म्हणजे आम्हाला ते थोड समजेल की, त्या वेळेचे लोकं कुठल्या पध्दतीने भरले गेले होते. आणि या टाईमाला जे अनुकंप धारक ज्यांना आता नियुक्त्या द्यायच्या आहे. ते कशामुळे थांबलेले आहे. ते लक्षात नाही येत आहे.

**मा.सभापती :-** आयुक्त मॅडम देत आहे उत्तर.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** आदरणीय सभापती साहेब, आदरणीय सभागृह, सर आमच्यापर्यंत जेव्हा विषय आला तेव्हा हा विषय नियमाप्रमाणे कसा केला जाईल. त्यावर आम्ही प्रोसेस करत आहोत. यापुर्वीच्या नियुक्त्या चुकीच्या होत्या किंवा बरोबर होत्या हे आता करणे बरोबर नाही होणार. बाकी सभागृहाला माहिती हवी असेल तर आम्ही संचिका घेऊन अभ्यास करुन एकदा सांगु की, कोणते कोणते नियम बघुन नियुक्त्या दिल्या होत्या.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तुम्हाला मी सांगतो मॅडम, त्याची पुर्ण संचिका मी तपासलेली आहे, त्याचा पुर्ण अभ्यास मी केलेला आहे. तत्कालीन ज्या नियुक्त्या देण्यात आल्या होत्या. मला त्याच्यामध्ये आक्षेप घ्यायचा नाही. किंवा मला त्याच्यावर काही प्रश्न ही उपस्थित करायचे नाही. परंतु माझा म्हणायचा अर्थ इतकाच आहे. त्यावेळेस जेव्हा आपण त्या लोकांना नियुक्त्या दिल्या. तत्कालीन नियुक्त्या ह्या कायद्याच्या चौकटीत राहुन आणि फक्त कायद्याची चौकट थोडी खाली वर करुन त्या लोकांना नियुक्त्या दिल्या होत्या. त्याच पध्दतीने या नियुक्त्या करण्यात याव्या कारण हे जे अनुकंपधारक आहे दिवसेंदिवस त्यांचे वय वाढत आहे. त्यामधील काही लोकं ऐजबार सुध्दा झालेले आहे. जेणे करुन या लोकांना वेळेत नौकऱ्या मिळाल्यानंतर मला वाटते त्यांचे पुढचे जे आयुष्य आहे किंवा कुटुंब आहे ते योग्य दिशेने जाईल योग्य दिशेने लागेल. परंतु आपण अश्या पध्दतीने त्यांना कायद्याचे काही तरी क्युऱ्या काढतो किंवा कायद्याने आपण वेळोवेळी त्यांना पत्र व्यवहार करुन निकष ठरवत असलो तर त्याच्यात फार वेळ जातो आहे. आणि ते बिचारे त्या नियुक्त्यांपासुन वंचित राहत आहे. मला वाटते की, तत्कालीन नियुक्त्या ज्या निकषावर देण्यात आलेल्या होत्या त्या निकषावरती या अनुकंप धारकांना नियुक्त्या देणेस हरकत नाही. तर तसे आपण संबंधीत प्रशासनाशी, संबंधीत व्यक्तीशी संबंधीत अधिकाऱ्यांशी आपण सर्व प्रशासन स्तरावर बसुन एक मिटींग कॉल करुन त्याच्यामध्ये काही पर्याय काढता आला, तर आपण प्रशासनाने पर्याय काढावा. जेणे करुन वेळेत आपल्याला या लोकांना नियुक्ती देता येईल.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, सभापती महोदय, कुलभुषण भाऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हा बोला ताई.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मी या संदर्भात मॅडमशी बोलली आणि लेटर पण दिलेले आहे की, आपण एक मिटींग काढावी. आणि या सगळया कर्मचाऱ्यांची जो प्रश्न आहे. ते सोडविण्यासाठी पण तसे मिटींगचे आयोजन करावे पण मॅडमांनी तसे केलेले नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बरोबर, सभापती महोदय, ज्योतीताई आस्थापनाच्या विधी समितीच्या सॉरी, आस्थापना समितीच्या ज्योतीताई समिती प्रमुख आहे.ताईंनी देखील आपल्याशी वेळोवेळी पत्र व्यवहार केलेले आहे. ताईंनी देखील या विषयाची विचारना केलेली आहे. मला असे वाटते की, याच्यामध्ये सन्मा.नितीन भाऊ आहे, सन्मा.महापौर आहे. आपले सन्मा. स्थायी समिती सभापती राजु भाऊ आहेत. मी आहे सर्व सन्मा.सदस्य आहे.

वेळोवेळी या विषयाचा पाठपुरावा करुन देखील प्रशासन अश्या पध्दतीने वागत असेल. आणि वेळकाढुपणा करत असेल तर मला वाटते की, अश्या पध्दतीचा काम कुठेतरी थांबले पाहिजे आणि अनुकंप धारकांना नियुक्त्या मिळायला पाहिजे. जेणे करुन त्यांचे आयुष्य आहे ते सुखरुप जाईल पुढचे. आणि त्यांना नौकऱ्या मिळतील.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मॅडम लवकर मिटींग काढा त्या संदर्भात.

**मा.अतिरिक्त आयुक्त :-** हो मॅडम आपला वेळ घेऊन मी एक बैठक लावते.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो. आणि अनुकंपाचे अनेक प्रश्न सुटतील त्यामधुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हा बोला भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** लॉकडाऊन ओपन झाला आहे. ३ तारखेपासुन जिल्हाधिकारी महोदयांनी तसे आदेश काढलेले आहे. परंतु जळगांव शहरातील उद्याने जी आहे ती अजुनपर्यंत सुरु झालेली नाही. या संदर्भात शहर अभियंतांशीपण मी काल बोललो. आणि त्या पध्दतीने शहर अभियंतांनी काल आदेश काढले. परंतु आदेश काढल्यानंतरही आजही शहरातील कार्यालय सुरु झालेली नसल्या कारणाने सकाळी मॉर्निग वॉकला येणारे लोकांची मोठया प्रमाणावर ओरड होती. तर या संदर्भात काढलेले आदेश जर कधी महानगरपालिका प्रशासनाने तसे आदेश काढले आणि तसे आदेश माझ्या निदर्शनालाही आणुन दिले. परंतु आदेश योग्य ठिकाणी पोहचलेले नसतील असे एकंदरीत दिसुन येत आहे. तरी त्या पध्दतीने त्यांना आज आदेशीत करुन त्या सुचना त्यांच्या पर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. जेणे करुन उद्या सकाळपासुन किंवा आज दुपार किंवा संध्याकाळपासुन उद्याने पुर्ववत सुरु होतील. या संदर्भातील दक्षता प्रशासनाने घ्यावी.

**मा.सभापती :-** नक्की भाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नवनाथ भाऊ आपला दोघांचा एक महत्वाचा मुद्दा आहे की, शिवाजी नगर उड्डाणपुलाच्या संदर्भात मागच्या १० दिवसापुर्वी आपण महावितरणला पत्र दिलेले होते की, जळगांव महानगरपालिका दिड कोटी रुपये आपल्या फंडातुन भरुन त्या पोल शिफ्टींगचा विषय जो आहे. तो तातडीने मार्गी लावणे गरजेचे आहे. कारण की आज आपण बघतो आहे की, मक्तेदार हा फक्त निव्वळ त्या विद्युत खांबांकडे बोट दाखवितो आणि विद्युत खांबांकडे बोट दाखवुन आपली जबाबदारी झटकुन मोकळा होतो. आज आपण बघतो, साधारणता ५० हजार ते १ लाख लोकांच्या जिवनाचा रोजचा प्रश्न आहे. आणि पुलाचे काम साधारणता मुदत संपुन मुदतवाढ ६ महिने मिळाल्यानंतर ही ते काम अद्यापपावेतो ५० टक्के च्या जवळपास पुर्ण झालेले आहे. तर माझी मा.सभापती महोदय विनंती आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेने आपल्या महानगरपालिका निधीतुन दिड कोटी रुपये महावितरण कंपनीकडे वर्ग करण्यात यावे आणि तातडीने त्या कामाला प्राधान्य देऊन ते काम सुरु करण्यात यावे हीच माझी विनंती आहे. आणि तुम्ही तसा ठराव आजच्याच स्थायी समितीच्या मिटींग मध्ये पारीत करुन त्या कामाला लवकरात लवकर चालना कशी मिळेल हा प्रयत्न करावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे नितीन भाऊंच्या म्हणण्यानुसार अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-** संबंधीत विभागप्रमुखांकडुन माहिती घेऊ या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय मला बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** बोला ना, याच विषयाशी संबंधीत आहे का ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही नाही, चार विषय वेगळे आहे जळगांव शहराचे.

**मा.सभापती :-** हा विषय होऊन जाऊ द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नवनाथ भाऊ यांचा खुलासा घेऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बर बर.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री.एस.एस.पाटील :-** सन्मा.सभापती साहेब आणि सन्मा.सभागृह, जळगांव शहर शिवाजी नगर उड्डाणपुलाच्या कामाकरीता आपण जी विज वाहिनी स्थलांतरीत करण्याचे काम करीत आहे. हे आपण महानगरपालिकेला मुलभुत सोईसुविधांकरीता जे २५ कोटी रुपये प्राप्त झाले होते. त्यातील जी शिल्लक निधी होती. त्या शिल्लक निधीतुन एकुण ७ प्रस्ताव आपण शासनाकडे मंजुरीला पाठविलेले आहे. या दिड कोटी रकमेच्या खर्चाचा प्रस्ताव विज वाहिनी स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव आपण शासनाकडे पाठविलेला आहे. आपण सदरचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयाला पाठविला असता, विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत

आपल्याला शासनाचे मार्गदर्शन व त्यांची उचित मान्यता घेणे संदर्भात आपल्याला कळविण्यात आले होते.त्याच्यानुसार आपण हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. दरम्यानच्या काळात मा.महापौर साहेबांचे एक पत्र आलेले होते की, शासनाची मंजुरी मिळण्याकरीता काही अवधी लागेल. म्हणुन त्या कामाची निकड लक्षात घेता, सदरचे दिड कोटी रुपये जे आहे मनपा फंडातुन महावितरण कंपनीला वर्ग करायचे, महावितरण कंपनीला वर्ग केल्यानंतर त्यांना कामाला सुरुवात करण्याची विनंती करायची. आणि नंतर २५ कोटी मधुन शिल्लक निधीतुन काम मंजुर झाल्यानंतर त्यातले जे दिड कोटी रुपये आहे निधीतले, ते महावितरण कंपनीला वर्ग करायचे. आणि महानगरपालिकेने या कामासाठी त्यांना जे दिड कोटी रुपये वर्ग केले असतील, डिपॉझीट म्हणुन ती जी रक्कम आहे. ती महावितरण कंपनीने परतावा करावा अथवा जी आपल्याला विद्युत देयकाची आपल्याला जी देय रक्कम आहे उच्च दाबाच्या मध्ये समायोजन करावे. आपण असे या संदर्भात आपण या संदर्भात मुख्य अभियंता आणि अधिक्षक अभियंता यांना आपण पत्राद्वारे याची प्रशासकीय भुमिका विचारना केलेली होती. त्यांच्याकडुन आपल्याला एक पत्र प्राप्त झालेले असुन महानगरपालिकेचा जो विचाराधीन प्रस्ताव होता त्याच्यानुसार हिताप्रमाणे रक्कम समायोजीत करता येणार नाही. असे आपल्याला त्यांच्याकडुन पत्र आलेले आहे. त्याच्यामुळे आपला जो विचाराधीन प्रस्ताव होता की, दिड कोटी रुपये त्यांना मनपा फंडातुन वर्ग करायचे नंतर निधीतुन प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर ती रक्कम वर्ग करायची आणि आपले जी दिलेले सुरुवातीचे दिड कोटी रुपये आहे मनपा फंडातले ते विज देयकातुन वर्ग करायचे. पण अश्या पध्दतीने होणार नाही असे त्यांनी आपल्याला कळविलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदय, महावितरण कडुन आलेले पत्र वाचले, या संदर्भात मनपा आयुक्तांशी सुध्दा चर्चा झाली. महावितरणचे धोरण जे आहे ते खुप आडमुठयापणाचे धोरण दिसुन येत आहे. परंतु त्यांच्या आडमुठयापणाच्या धोरणामुळे शेवटी जळगांव शहरातील प्रचंड मोठी लोकसंख्या वेठीस धरली जात आहे. हजारो लोकं रेल्वे ट्रॅक क्रॉस करुन दैनंदिन दिवसातुन ५० वेळा,आपला जिव धोक्यात टाकुन प्रवास करतात. या सगळया गोष्टींचा जर कधी विचार केला. तर मला वाटते की, एखाद्या निष्पाप माणसाचा जिव सुध्दा याच्यामध्ये जाऊ शकतो. या अनुषंगाने दिड कोटी रुपये मनपा निधीतुन भरण्याचा आज आपण निर्णय घ्यावा. दिड कोटी रुपयांचा जो निधी आपण प्रस्तावीत करुन पाठविला, त्याचा विनियोग वेगळया पध्दतीने करण्याच्या दृष्टीकोणातुन तसा नविन रितसर प्रस्ताव पाठवु या. परंतु शासनाच्या मान्यतेची वाट पाहण्यामध्ये अजुन किती महिने जातील. आणि इतक्या महिन्यांमध्ये कोणाची जर जिवीत हानी झाली तर मला वाटते की, ते योग्य होणार नाही.

**मा.सभापती :-** भाऊ आज निर्णय घेण्याच्या ऐवजी आपण नियमाप्रमाणे विभाग प्रमुखाकडुन प्रस्ताव येऊ द्या त्या सभेमध्ये आपण निर्णय घेऊ या. लवकरात लवकर आपण स्थायी समितीची मिटींग घेऊ. आणि त्याच्यामध्ये निर्णय घेऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, प्रस्ताव तश्या पध्दतीचा तयार केलेला आहे. आणि मा.जिल्हाधिकारींशी सुध्दा या विषयावर चर्चा झालेली आहे. म्हणजे कुठेही आपण चुकीचे काम करतो आहे अश्यातला भाग नाही. परंतु ही निर्णय प्रक्रिया आपण बघतो आहे की, २५ कोटीच्या निधीतुन या वेळेला हे पोल स्थलांतरीत करण्याचे काम प्रस्तावीत केलेले आहे. त्या गोष्टीला सुध्दा आता तब्बल ६ महिन्याचा कालावधी झाला आहे. आपण किती दिवस वाट पाहणार आणि किती दिवस लोकांचे जिव धोक्यात घालणार. आपण कुठलेही बेकायदेशीर काम करत नाही किंवा बेकायदेशीर कृत्य करत नाही. शेवटी जळगांव शहराचा महत्वाचा प्रकल्प आहे तो. आणि फक्त दिड कोटी रुपयाच्या निधीसाठी तो प्रकल्प प्रलंबीत ठेवणे, त्याच्यामध्ये दुर्लक्ष करुन चालणार नाही. शेवटी लोकांचा जिवन मरण्याचा प्रश्न येतो.

**मा.सभापती :-** हो ना भाऊ , प्रशासनाकडुन प्रस्ताव येऊ द्या ना. आपण लवकरात लवकर सभा घेऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, प्रशासनाचा प्रस्ताव एस.एस. पाटील साहेबांकडे तयार आहे. आपण आताच त्याच वाचन करुन घ्यावे. आणि ती टिप्पणी वाचुन करुन संपुर्ण सभागृहाचे समाधान करुन घ्यावे.

**मा.सभापती :-** तुमच्याकडे प्रस्ताव आहे आता ?

**विद्युत विभाग प्रमुख, श्री. एस.एस.पाटील :-** नाही.

**मा.सभापती :-** आता प्रस्ताव नाही भाऊ. आपण लवकरच काढु ना आपण मिटींग काढुन टाकु लगेच. दोन दिवसात प्रस्ताव आला की, आपण मिटींग कॉल करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक काम करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय, लवकरात लवकर मिटींग काढा मग.

**मा.सभापती :-** येऊ द्या ना. तुम्ही दर आठवडयाला डॉकेट पाठवा आपण दर आठवडयाला मिटींग काढु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाटील साहेब आपण डॉकेट केव्हा द्याल.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री. एस.एस.पाटील :-** याच्यासाठी आपल्याला महासभेची पण मान्यता लागणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महासभेची मान्यता जी आहे ती १२ तारखेला घेऊ. त्या बद्दल वाद नाही. तसे महापौर ताईंनी पत्र सुध्दा दिलेले आहे. महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन आपण पेमेंट वर्ग करु.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री. एस.एस.पाटील :-** महासभेच्या मान्यतेस अधिन राहुन आम्ही हे प्रस्ताव तयार केलेला आहे. प्रस्तावावर शहर अभियंतांची स्वाक्षरी झालेली आहे अभिप्राय झालेला आहे. मुख्य लेखाधिकारी यांचा ही अभिप्राय त्याच्यावर झालेला आहे. मुख्य लेखा परिक्षक साहेबांचा अभिप्राय घेऊन मा.आयुक्त साहेबांची स्वाक्षरी झाल्यानंतर आपल्याला पुढची कार्यवाही करता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटते कुलभुषण भाऊ. महासभेच्या मान्यतेला अधिन राहुन आपण यांना आदेश द्यायचे का ?

**श्री.कुलभुषण पाटील :-** पहिली गोष्ट तर पाटील साहेब आणि सभापती महोदयांनी सांगीतले, भाऊ याच्यामध्ये आपल्याला निश्चित झालेला आहे. आपल्याला पैसे वर्ग करायचे आहे. आपल्याला जे काही आता निर्णय घ्यायचा आहे. तो हाच घ्यायायचा आहे की आपल्याला. जो काही निधी आपण याच्यासाठी वापरणार आहेत. पोल शिफ्टींगसाठी तो दिड कोटी रुपये दिलेला आहे परंतु हे निधी देण्यासाठी काही टेक्नीकल गोष्टी आहे. त्यासाठी शासनाची परवानगी घेणे गरजेचे आहे. तो पर्यंत आपल्या मनपा फंडातुन निधी वर्ग करण्याचा आपण निर्णय घेऊ शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाटील साहेब. आपण महासभेच्या धोरणात्मक निर्णयाच्या अधिन राहुन आजच्या आज मा.जिल्हाधिकारी महोदयांना भेटुन त्या संदर्भातला निधी वर्ग करण्याच्या संदर्भातली कार्यवाही करावी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ आपण हे महासभेत ठरविणारच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना, फक्त त्यांना तेवढेच अश्युरंस पाहिजे की, महासभेच्या धोरणात्मक निर्णयास अधिन राहुन कार्यत्तर मान्यता घेण्यात येईल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.महापौरांनी पत्र सुध्दा दिलेले आहे.

**मा.सभापती :-** उपमहापौर महोदय, आपला आवाज क्लियर येत नाही. आपण एकतर गाडी थांबवुन घ्या. आपला आवाज तुटत आहे आणि आवाज इकडे येत नाही. सभागृहात आपला आवाज येत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजु भाऊ, उपमहापौरांची गाडी थांबवु नका, त्यांची गती कमी करु नका.

**मा.सभापती :-** नेटचा प्रॉब्लेम येत आहे भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** गाडीची गती वाढविणे संदर्भात सुचना करा.

**मा.सभापती :-** पण ते गती घेतांना नेटवर्कच्या बाहेर पण जायला नको ना. नेटवर्कच्या बाहेर पण जायला नको याची काळजी घेतली पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काही प्रॉब्लेम नाही. पाटील साहेब.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महासभेच्या अधिन राहुन तसे पत्र महापौरांनी दिलेले आहे. आणि प्रस्तावही तसाच बनलेला आहे. महासभेचे अधिन राहुन फक्त आपल्याला वर्ग करण्याच्या बाबतीत निर्णय आपल्याला घ्यायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि जर पाटील साहेब तुम्हाला महापौरांनी दिलेल्या पत्राच्या संदर्भात काही अडचण वाटत असेल. नव्या पध्दतीचे पत्र अपेक्षित असेल तर त्याबद्दल मी महापौरताईंशी सुध्दा चर्चा करतो. आणि आज तुम्हाला अपेक्षित असलेले पत्र सुध्दा तुम्हाला द्यायला लावतो. परंतु निधी हा आज वर्ग व्हायला पाहिजे. जेणे करुन त्या कामाला पैश्यांच्या अभावी तो प्रकल्प लांबविला गेला नाही पाहिजे. तेवढीच आमची विनंती आहे प्रशासनाला. पाटील साहेब काही अडचण आहे का आपल्याला,

**विद्युत विभाग प्रमुख, श्री. एस.एस.पाटील :-** नाही, काही अडचण नाही. प्रस्ताव जो आहे तो पुर्णपणे करुन घेतो. आज आयुक्त साहेबांची मान्यता घेतो. आणि पुढील कार्यवाही करतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु मी जिल्हाधिकारी साहेबांशी पण बोलतो या विषयावरती, परंतु आज तुम्ही तातडीने आज प्रक्रिया पुर्ण करुन कारण १५ दिवसापुर्वी सुध्दा ह्या सर्व गोष्टी ठरलेल्या होत्या.निधी वर्ग करण्याच्या संदर्भात

फक्त ती महावितरणची आडमुठेपणेची भुमिका बघता, १५ दिवसाचा कालावधी सुध्दा वाया गेलेला आहे. तर आज आपल्याकडुन कुठलीही दिरंगाई होणार नाही याची काळजी घ्या आपण.

**विद्युत विभाग प्रमुख, श्री. एस.एस.पाटील :-** हो जरुर.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** भाऊ तुमचा आवाजच आम्हाला कळत नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** येतो आहे का आवाज.

**मा.सभापती :-** आवाजच क्लियर येत नाही तुमचा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता येतो आहे.

**मा.सभापती :-** हो येत आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपण जो काही निर्णय घेतलेला आहे २५ कोटी रूपयांमधुन पोल शिफ्टींग साठी दिड कोटी रूपयांचा ते आपल्याला आता तिकडे पुर स्थिती असल्यामुळे कोकणमध्ये तर ते संबंधित काम जी आहेत मंत्रालयामध्ये ती थांबुन आहेत. जर असेच ते काम थांबुन राहीले तर आपले जळगांव शहर वासीयांना होणारा त्रास हा कमी झालेला नाहीये. तर हा होणारा त्रास कमी झालेला नाहीये. भविष्यामध्ये जेव्हा शाळा सुरू होतील. तेव्हा त्यावेळेस त्या पुलाच्या संदर्भात इतक्या अडचणी निर्माण होणार आहे. तर आपण जितक्या लवकर निर्णय घेतला तर चांगले होईल हा प्रस्ताव मंजुर होवुन येणारच आहे याच्यात शंका निर्माण होण्याचे काही कारण नाहीये कारण आपल्याला हा निर्णय घेणे गरजेचे आहे. शासनही त्या दृष्टीने विचार करतय तर आपण लवकर निर्णय घेवुन ते काम करणे तातडीच आहे. सन्मा.नगरविकास मंत्र्यांनी स्वत: लक्ष घातलेले आहे त्या विषयामध्ये ते आपल्याला मिळणारच आहे . परंतू आपण पोल शिफ्टींगसाठी आपण आपल्या स्तरावर जर का कामकाज सुरू केले तर मला अस वाटत की तो प्रश्न लवकर सुटेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे , योग्य आहे.

**मा.सभापती:-** आपण करायला तयार आहोत ना भाऊ आपण येथे निर्णय घेण्यासाठीच बसलेलो आहेत. परंतू काय आहे नियमानुसार कुठलाही निर्णय घेतला गेला पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ त्याच्यामध्ये कठलाही आपण बेकायदेशीर तत्वांचा अवलंब करत नाहीये. परंतू तातडीचा विषय असल्याकारणाने आपण त्याला तत्वात: मान्यता महासभेमध्ये देवुच व त्याला मान्यता देवु काही विषयच नाही ना .

**मा.सभापती:-** भाऊ महासभा काही लांब नाहीये फक्त ४ दिवसांवर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**मा.सभापती:-** ४ दिवसांवर महासभा आहे आपण लगेच दुसऱ्या दिवशी मिटींग कॉल करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ हा विषय

**मा.सभापती:-** दुसऱ्या दिवशी मिटींग कॉल करू तुम्ही म्हणाल तर

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ या संदर्भात गेल्या फेब्रुवारी पासुन या प्रस्तावाचा प्रवास सुरू आहे.

**मा.सभापती:-** हो ना हो ना पण आपण चारच दिवस बाकी आहेत ना इतके दिवस नाहीयेत .

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ नाही ना या संदर्भात निधी वर्ग करण्याच्या संदर्भात कुठलीच लागले तर मा. जिल्हाधिकारी साहेबांशी सुध्दा बोलतो मी या विषयावर आज मी जिल्हाधिकारी साहेबांशी सुध्दा बोलतो आणि त्या संदर्भातील प्रस्तावही तयार केलेला आहे. आपण देवुना त्यांना कार्योत्तर मान्यता देवु ना . त्यांना या प्रक्रीयेला तरी कुठे अडचण येते आहे.

**मा.सभापती:-** भाऊ प्रस्ताव येथे येवु द्याना आपण आयत्यावेळेचे विषय कुठलेच घेत नाहीत ना आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण

**मा.सभापती:-** भाऊ येवु द्याना

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतो राजुभाऊ

**मा.सभापती:-** ऐका ना भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ

**मा.सभापती:-** भाऊ हा प्रस्ताव दोन दिवस आधी दिला असता तर आपण निर्णय याच्यावर घेतला असता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ आज कुठलाही ठराव करू नका , आज आपण त्यांना कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन परवानगी देतोय आज ठराव करू नका.

**मा.सभापती:-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठराव आपण नंतर देवु आपण पहिले महासभेचा धोरणात्मक निर्णय घेवु आणि त्याच्यानंतर त्यांना ठराव देवु . परंतु महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन त्यांनी निधी तिकडे वर्ग करावा . एवढेच आपण सुचना त्यांना करतोय

**श्री. कुलभुषण पाटील :-** आणि भाऊ ते काही अडचणीच नाहीयेना

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ना , नाही ना

**मा.सभापती:-** महासभेच्या निर्णयास अधिन राहुन हरकत नाही निर्णय घ्यायला . आपण घेवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे.

**मा.सभापती:-** हो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय मला बोलायचे आहे.

**मा.सभापती:-** बोला भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय

**मा.सभापती:-** बोला भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय

**मा.सभापती:-** दारकुंडे भाऊ बोला ना

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय माझा प्रशासनाला एक विषय आहे. घरपट्टी करामध्ये साफसफाई कर वसुल करताहेत २०२ किंवा २२२ रूपये आणि कचरा प्रकल्प १११ रूपये वसुल करताहेत.आता मला एक सांगा घरपट्टीच्या याच्यामध्ये मलेरिया , डेंग्यु याच्या सुखसुविधा दिल्या पाहीजे जळगांव शहराला प्रशासनाला मला हे विचारायचे आहे की हे डेंग्युच्या संदर्भामध्ये तुम्ही जळगांव शहरामध्ये कोणत्या संदर्भात उपाययोजना केल्या आतापर्यंत मलेरिया विभागाने सांगावे.

**मा.सभापती:-** या

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** नमस्कार साहेब आता जळगांव शहरात सध्या आपण पंप फवारणीचे जे काम आहे. ते काम पुर्ण केलेले आहे. आपण रोज एक प्रभाग म्हणजे प्रभाग क्रं. १ , प्रभाग क्रं. २ असे आपण १९ प्रभाग पुर्ण केलेले आहेत. या प्रभागांमध्ये आपण पंप फवारणीचे काम पुर्ण केलेले आहे. आपण ऑईलपण टाकलेले आहे. आपल्याकडे जी पावडर आहे ती पण आपण टाकलेली आहे. आपण जुन पासुन ती सुरूवात केलेली आहे. जळगांव शहरात जे डबके आहेत त्याच्यामध्ये आपण ऑईल टाकण्याचे काम पण सुरू केलेले आहे आणि पावडर जो आहे तीही टाकण्याचे काम आपण सुरू केलेले आहे. त्यानंतर आपण

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** किती वाजता तुमचे लोक जातात प्रभागामध्ये नगरसेवकांना भेटतात का ?

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** हो आपण काय करतो प्रत्येक दिवशी जो प्रभाग असतो त्या दिवशी आपण वॉर्डात जातो , त्यानंतर कर्मचारी कशे टाकलेले आहेत त्यांचे जे नियोजन असत ते नगरसेवकांना दाखवतो आणि त्यानंतर त्या नगरसेवकांच्या सह्या आपण घेतो, तर ऑलरेडी आपण

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** किती लोक उपलब्ध आहे आता फवारणी साठी

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** आपल्याकडे २९ लोकं उपलब्ध आहेत आता आपले कर्मचारी

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो , आणि डेंग्युचे एकपण पेशंट नाहीये का आता तुमच्या जळगांव शहरामध्ये

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** आहे डेंग्युचे २६ आहेत त्याच्या ठिकाणी आपण २४ ठिकाणी धुरळणी केलेली आहे. कालपर्यंत आपल्याकडे संध्याकाळ पर्यंत जे दोन पेशंट आलेले आहेत. त्या दोन पेशंटांची आज धुरळणी आज होवुन जाईल. त्यानंतर काही असे दोन जण आहेत त्यांच ट्रेसिंग झालेले नाहीये आणि एक धुळयांला आहे त्यापैकी असे आपल्याकडे २६ च पेशंट आहेत आणि आपण त्यापैकी २४ ठिकाणी आपण धुरळणी केलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो आता तुम्ही एक दिवस एक प्रभाग घेता का ?

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** हो एक दिवसात आपण एक प्रभाग घेतो फवारणी करीता

**श्री.नितीन लढ्ढा :-** आतापर्यंत किती प्रभाग झालेत

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** किती प्रभाग झालेत

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** आपण पुर्ण १९ प्रभाग केलेले आहेत आणि सगळ्या नगरसेवकांच्या सह्याही घेतलेल्या आहेत ज्यांच्याशी संपर्क झाला नाही फक्त असे चारच लोकं बाकी आहेत. ७५ पैकी ७१ की ७० , ७१ नगरसेवकांच्या सह्या घेतलेल्या आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ४ लोक कोण कोण आहेत.

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** एक तर आपले नेरकर मॅडम होत्या.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक मिनिटं ताई त्यांच उत्तर देवु द्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** थांबा ताई त्यांना त्यांच उत्तर देवु द्या.

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** एक तर आपले नेरकर मॅडम होत्या, त्यांना फोन केले तर ते पुण्याला होते, तर त्या म्हणाल्या की तुम्ही फवारणी करून घ्या आणि मी आल्यानंतर तुमच्याशी भेट घेवुन घेईल असे म्हणाल्या त्यानंतर आपण विष्णुभाऊंकडे गेले होते. तर विष्णुभाऊ कुठेतरी बाहेरगांवी गेलेले होते तर आपण सुनिलभाऊंना भेटले होते. मेडीकल वर तर त्यावेळेला त्यांची सही घेतली होती आणि आपले बळीरामदादांची डेट झाली होती तर तेवढी आपले शामदादांची सही घेता आली नाही फक्त तर एवढे आपले तिन ते चार नगरसेवकांच्या सह्या घेता आल्या नाहीत पण आपण ७१ नगरसेवकांच्या सह्या घेतलेल्या आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझी नितीन लढ्ढांची सही घेतली आहे का ?
**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** नाही भाऊ तुमच्या घरी मी पाठवला होता पंप फवारणीवाला माणुस तुम्ही बाहेर गेलेले होते तुमच्या कर्मचाऱ्याने फोन केला होता तुम्हाला की माणुस आलेला आहे फवारणीसाठी येथे असा तुम्हाला फोन केला होता त्यावेळेला.
**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही माझ्या प्रभागात
**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझ्याकडे पण आलेले नाहीयेत.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सर्व नगरसेवक काय म्हणताहे ऐका
**सौ.उज्वला बेंडाळे :-** ते सांगताहेत पण आलेले नाहीयेत.
**श्री.प्रशांत नाईक :-** माझ्याकडे पण आलेले नाहीयेत.
**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय अॅबेटींगला येवुन गेले पण ते सांगताहेत आलेले नाहीयेत. सह्या घेवुन गेले पण फवारणीसाठी आलेले नाहीत.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशांतभाऊ कुठे आहे आता
**श्री.प्रशांत नाईक :-** कामाच्या ठिकाणी आहे भाऊ काम चालु आहे आता
**श्री.नितीन लढ्ढा :-** अस आहे का
**श्री.प्रशांत नाईक :-** हो
**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** आपण १ जुलैपासुन फवारणीचे काम सुरू केले होते आणि त्यानंतर १९ तारखेपर्यंत सगळया वॉर्डात फवारणी केलेली आहे. सगळया नगरसेवकांच्या सह्याही घेतलेल्या आहेत.
**श्री.प्रशांत नाईक :-** आमच्या वॉर्डात फवारणी झालेली नाहीये सुधिरभाऊ
**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** भाऊ तुमचा शिक्काही घेतला होता भाऊ तुम्ही प्रत्यक्ष भेटले होते भाऊ
**श्री.प्रशांत नाईक :-** फवारणी , फवारणी
**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** हो भाऊ फवारणीचेच म्हणतोय मी
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब हॅलो
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशांत सही शिक्का देवुन टाकतो
**श्री.प्रशांत नाईक :-** चुकीने देवुन टाकला असेल
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय आता हे १९ प्रभाग झाले म्हणताहेत यांच्याकडे किती किट आणि किती औषधी शिल्लक आहे आणि यांच्याजवळ किती माणस आहेत आणि ते किती घंटे काम करतात हे यांनी रेकॉर्डवर घेतलय का नाहीतर मी पुरावा देतो यांना हे लोक बाहेरच्या बाहेर घरच्या लोकांच्या सह्या घेतात. नगरसेवकाला सांगत नाहीत आणि इकडे सांगतात की आम्ही १९ वॉर्ड पुर्ण केले
**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** नाही भाऊ
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता मला एक सांगा की पावसाळयाचे दिवस आहेत.समजा कोविड पुन्हा उभरला तर त्याची जबाबदारी कोण घेईल प्रशासन घेईल का ?
**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ हे घरी आले होते आणि घरून सही आणि शिक्के मारून घेवुन चालले जातात
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो ना मग तेच ना माझ एक म्हणण आहे वरणगांव नगरपालिका मध्ये गोसावी साहेब होते तिथे आयुक्त म्हणुन त्या वेळेपासुन फवारणी आतापर्यंत चालु आहे. तश्याच ठेकेदाराला का उपलब्ध करून देता नाहीयेत हे कर्मचाऱ्यांवर अवलंबुन राहतात आपले कर्मचारी काम करीत नाहीत हो. खोट बोलतात हे लोक अधिकारी लोक फोन उचलत नाहीत हे लोक आणि त्यात घरपट्टी टॅक्स लोकांकडून वसुल करता तुम्ही लोक , काय सुविधा देता जळगांव शहराच्या नागरीकांना तुम्ही डेंग्युच्या संदर्भात ?
**मा.सभापती:-** शहरामध्ये डेंग्युचे किती पेशंट आढळुन आले आहेत याची नोंद तुमच्याकडे आहे का ?
**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** भाऊ आपल्याकडे डेंग्युचे २६ पेशंट आहेत ते संशयित आहेत.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्ही कुठुन उपलब्धी घेतली ही , कुठुन माहिती घेतली ही
**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** भाऊ ही माहिती जी आहे आपले जे डिएमओ ऑफीस असते ना त्यांच्याकडुन आपल्याला त्यांचा फोन येतो किंवा मग ते आपल्याकडे माणस पाठवतात. त्या हिशोबाने आपण त्या ठिकाणी धुरळणी आणि फवारणीचे काम करतो.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो प्रायव्हेट दवाखान्यामध्ये तुम्ही आजपण पाहीले ना तर तिनशे ते चारशे पेशंट सापडतील. तुम्ही त्या लोकांना का सांगत नाही, प्रायव्हेट दवाखान्यावाल्यांना आदेश का काढत नाहीत.त्याच्यामुळे डेंग्युचा प्रसार वाढला तर जबाबदार कोण राहील.
**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** भाऊ आपण जे प्रायव्हेट दवाखाने आहेत आणि लॅब आहेत सगळ्यांना आपण आदेश काढलेला आहे डिएमओ थ्रु ही आणि आपले रावलानी साहेब आहेत त्यांनीही आदेश काढलेला आहे. त्यांनी एक ग्रुप तयार केलेला आहे नोटीफायवर्ल्ड ग्रुप म्हणुन त्या ग्रुपमध्ये ज्यांच्याकडेही पॉझिटिव्ह पेशंट निघतात किंवा अॅडमिट होतात किंवा एखाद्या लॅबमध्ये त्यांची चाचणी होते आणि त्याचा जर रिपोर्ट पॉझिटिव्ह आला तर ते स्वत:हुन त्या ग्रुपमध्ये

टाकतात. त्या गृपमधुन मी एक यादी मेंटेन करतो आणि जसे जसे त्या पेशंटचे नांव आले . त्या ठिकाणी धुरळणी आणि ॲबेटींगचे काम करून टाकतो .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुमच्या २९ लोकांमध्ये फवारणी होते का जळगांव शहराची ?

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** हो आपण पुर्ण जळगांव शहर एका दिवसात नाही करत , आपण काय करतो , आपण एक नियोजन केलेले आहे.प्रत्येक प्रभागाचे की एका वॉर्डात किती कर्मचारी लागणार आहे किंवा तो किती प्रभाग घेणार आहे . तर ज्या दिवशी आपल्याकडे जेवढे कर्मचारी उपलब्ध असले. आपण तिथपर्यंत तो भाग घेवुन टाकतो आणि पुढचा भाग दुसऱ्या दिवशी आपण घेतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे रोटेशन सिस्टिमने

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझा

**श्री.नितीन लढ्ढा :-** रोटेशन सिस्टिमने करतात

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** हो हो

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला मॅडम

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, मी गेल्या आठ दिवसांपासुन फोन केलेला आहे. माझ्या प्रभागात अजुन फवारणी बाकी आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ते म्हणताहेत की फवारणी झाली सगळी कडे

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाही , नाही

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** मॅडम ॲबेटींगचे काम केलेले आहे आपण आणि फवारणीच कामाचा फोन आपण मागच्या महिन्यामध्ये केला होता.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाही , नाही मी त्या रजिष्टरवरपण लिहुन दिले आहे की ॲबेटींग झाले आहे . पण मला फवारणीची गरज आहे हे मी तुम्हाला

**मा.सभापती :-** प्रभाग क्रं. १३ मध्ये

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** हो , हो आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रभाग क्रं. १२ मध्ये

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** हो आपण जे आहे याच्या आधीच्या राऊंडला ती फवारणी केलेली आहे. त्याच्यामध्ये.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाही , नाही फवारणीची माझी कोणतीही सही नाहीये तुमच्याकडे

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय,

**श्री.सोनवाल , मलेरिया विभाग प्रमुख :-** मॅडम तुमच्या प्रभागात फवारणी करून तुमची सही घेण्यात येईल मॅडम

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** सोनवालजी थोड काळजीपुर्वक करा कारण कस आहे डेंग्युचा प्रादुर्भाव हा

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** भाऊ माझ एक म्हणण आहे

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो बोला

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** भाऊ वरणगांव धर्तीवर जर यांनी काम केलं तर वरणगांव नगरपालिकेच्या धर्तीवर जे चालु आहे तिथे वरणगांवला त्या धर्तीवर जर जळगांव शहराचे तर प्रत्येक प्रभागात माणुस तिन टाईम फवारणी करेल तिथली उपाययोजना चालु आहे वरणगांवमध्ये हे लोक गोसावी साहेबांना सगळ माहिती आहे या विषयासंदर्भात मागे प्रस्ताव सुध्दा सादर केला होता मागे आता माझ्या प्रभागाचा कुठ पडला आहे हा प्रस्ताव हे जळगांव शहरात राहत नाहीत का अधिकारी लोक , तो प्रस्ताव सहा महिन्यापासुन पडलेला आहे धुळखात आणि तो कलेक्टरने सुध्दा मान्य केला आहे या विषयावर , बाकी तो जो डेमो वापरणार आहे तो नगरपालिकेचा वापरावा आणि त्या धर्तीवर ते काम सुरू करावं माझ हे म्हणण आहे तुम्हाला

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय , आपण स्वत: माहिती घ्या या विषयाची

**मा.सभापती :-** हो भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि माहिती घेवुन अभ्यास करून घ्या.

**मा.सभापती :-** हो भाऊ नक्की

**श्री.नितीन बरडे :-** राजुभाऊ मला बोलायचे आहे

**मा.सभापती :-** हो भाऊ बोला

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** आणि दुसरा विषय असा आहे. वॉटरग्रेस कंपनीचा जेव्हा पासुन वॉटरग्रेस कंपनीला आपली १३० वाहने दिली होती. त्या १३० वाहनांचे आतापर्यंत इंन्शुरंन्स किती तारखेला कसे काढले गेले . रेकॉर्डवर आहे का बोलवा त्यांना वाहन विभाग प्रमुखांना

**मा.सभापती :-** साहेब या

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** आरोग्य विभागाने वॉटरग्रेस कंपनीला १३० वाहने दिलेली आहेत. त्यापैकी ८५ घंटागाड्यांचे विमा काढण्यात आलेले आहेत आतापर्यंत

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** साहेब केव्हा काढले आहेत.

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** आता ३०/०६/२०२१ ला

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** केव्हा मुदत संपली ?

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** त्यांची मुदत ३०/०३/२०२१ ला संपलेली होती.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** साहेब आपण काढायचा असतो की वॉटरग्रेसने इंन्श्युरंस काढायचा असतो ?

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** आपण त्यांना कळविलेले होते

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** मग त्यांनी भरला का ?

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** नाही त्यांनी ती कार्यवाही न केल्यामुळे आपल्याला ती कार्यवाही करावी लागली आणि आपण त्यांच्याकडुन वसुली करीता आदेश दिलेले आहेत आरोग्य विभागाला

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** मग ती वसुली त्याच्याकडुन रोकडा होणार आहे की तो त्याच्या खात्यातुन भरणार आहे. बिलातुन होणार आहे का ?

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** आपण आरोग्य विभागाकडे तो रिपोर्ट दिलेला आहे की यांच्या देय असलेल्या रकमेमधुन वजा करण्यात यावी म्हणुन

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** का बर त्याची जबाबदारी नाही का ? इंन्शुरंस भरायची

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** त्याचीच जबाबदारी आहे आपण त्याला वेळोवेळी कळवितो आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** मग आपण वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे आणि तो बिलातुन कपात करत नाही. आपण शेवटचा रिपोर्ट मारल्यानंतर मग तो वॉटरग्रेसवाला काय करतोय आतापर्यंत काय लक्ष देताय तुम्ही १३० घंटागाड्यावर ?

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** आता त्याच्या पाठीमागे त्यांनी फिटनेस वैगेरे याच्याकरीता नाही का संबंधित वाहनांची कागदपत्रे घेवुन गेलेले आहेत दोन तिन दिवसांपुर्वी

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** अहो साहेब आतापण तसेच सांगताहेत मागे पण तसाच प्रकार घडला आपण कट केले आता मला एक सांगा

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** हो

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** ते वाहने सगळी आयुक्त साहेबांच्या नावावर आहेत. काल अनुचित प्रकार घडला तर आयुक्त साहेबांना जेल मध्ये टाकताल का तुम्ही ?

**मा.सभापती :-** जर का मार्च महिन्यामध्ये तो इंन्श्युरंस संपलेला असेल , तर ही खुप चिंताजनक बाब आहे आपण पाच पाच सहा सहा महिने त्या गोष्टीकडे लक्ष देत नाही. दुर्देवाने एखादा अपघात घडला आणि कोणाचे काही मृत्यु झाला. तर त्याची नुकसान भरपाई ही महापालिकेला देणं भाग आहे. म्हणुन आपण ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. आपण प्रमुख आहेत तर आपण त्याच्यावर लक्ष दिले पाहीजे आणि वेळोवेळी कुठलीही वाहने असेल. घंटागाड्याच नव्हे तर कुठलेही वाहन असेल तर त्याचे इंन्श्युरंस हे वेळेवर काढले गेले पाहीजे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** राजुभाऊ आता तिसरा प्रश्न शहरातील एलईडी लाईट संदर्भात आहे. हॅलो चार प्रश्न आहेत माझे एलईडी संदर्भात सांगतो जळगांव शहरात ज्या ज्या ठिकाणी एलईडी लावले आहेत. त्या ठिकाणी बंद झालेले एलईडी चालु करत नाहीयेत ते लोकं का करत नाहीत? आज येता , काल येता , परवा येता , गाडी नाही, एमएसईबी वाले लाईट बंद करू देत नाहीत. आता कुठपर्यंत ऐकायचे नगरसेवकांनी

**श्री. नितीन बरडे :-** पाटील साहेबांना बोलवा नवनाथभाऊ

**मा.सभापती :-** पाटील साहेब या

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** पाटील साहेबांना बोलवा

**मा.सभापती :-** पाटील साहेब एलईडी लाईट बंद झाल्यानंतर तो किती वेळेमध्ये बदलला गेला पाहीजे

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** एलईडी बंद झाल्यानंतर तो ४८ तासांमध्ये बदलला गेला पाहीजे आणि

**मा.सभापती :-** जर समजा त्याने ४८ तासामध्ये न बदलला तर त्याला पॅनल्टी वगैरे काय आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आहे पॅनल्टी वगैरे आहे.

**मा.सभापती :-** ती अवगत करावी सभागृहात

**श्री. नितीन बरडे :-** पाटील साहेब

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** दोन महिने झाले माझ्या प्रभागात लाईट बंद आहे.

**श्री. नितीन बरडे :-** पाटील साहेब माझ्या वॉर्डात तर अजुन लाईटच बदलविले नाहीत जुने लाईटं आहेत. तुम्ही सांगीतले होते की लाईटं बदलविले आहे. तुम्हाला दाखवुन देईन मी जुने लाईटे

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** सन्मा.सभागृह आपण ज्यावेळेला एलईडी पथदिवे बसविण्याच्या संदर्भात आपण ईएसएल कंपनीशी करारनामा केलेला होता. त्यांना त्यावेळेची जी सद्यस्थिती होती. जळगांव शहरातल्या पथदिव्यांच्या संदर्भातील ती आपण त्यांना दिलेली होती आणि ती आपण जळगांव शहरामध्ये १५ हजार ५०० पथदिवे

साधारण त्यावेळेला जळगांव शहरात होते. त्याच्या अनुषंगाने त्यांनी आपल्याला प्रस्ताव दिलेला होता. प्रस्ताव आपण महासभेच्या पुढे ठेवल्यानंतर त्याला महासभेत धोरणात्मक निर्णय घेवुन

**श्री. नितीन बरडे :-** पाटील साहेब ते सर्व माहिती आहे. तुम्ही जे सांगताहेत ना ते सर्व माहिती आहे आम्हाला

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** लाईटचा विषय सांगा.

**श्री. नितीन बरडे :-** त्या ठिकाणी एलईडी लावला होता तो बंद पडल्यानंतर आपले टि फाईव्ह लावले होते ते परत का बदलले गेले नाही.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आपण याच्या संदर्भात

**श्री. नितीन बरडे :-** हा प्रस्ताव वगैरे आम्हाला माहिती आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** बरोबर आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आपण याच्या संदर्भात ईएसएल कंपनीला बंद पथदिवे बदलविण्या संदर्भात आपण त्यांना निर्देश दिलेले आहेत. बंद पथदिवे जवळजवळ आता जळगांव शहरामध्ये बंद पथदिव्यांचे जे मेंटेनन्सचे काम होत. ते जवळजवळ त्यांनी आतापर्यंत टप्प्याटप्प्याने ते जसे जसे बंद पडले तसे तश्या पध्दतीने त्यानी आतापर्यंत जवळजवळ साधारण १४५० लाईट त्यांनी आपल्याला बदलवुन दिलेले आहेत आणि सद्याच्या काळात पावसामुळे बंदचे प्रमाणही वाढलेले आहे आणि आपल्या द्विपक्षीय करारनाम्यानुसार त्यांनी आपल्याकडे आज म्हणजे आपण ज्यावेळेला प्रस्ताव केलेला होता त्यावळेला १५ हजार होते. तरी आपण त्यांच्याकडुन १७५०० एलईडी पथदिवे बसवुन घेतलेले आहेत. आणि याच्यानंतर आपण त्यांना पार्शनल कंम्प्लिशन जे आपण त्यांना दिलेले आहे. आपण पार्शनल कंम्प्लिशन हे आपण त्यांना देतो आहेत ते या आठवड्यात आपण त्यांना देवु. पार्शनल कंम्प्लिशन दिल्यानंतर त्यांच अधिकृत कॉल सेंटर सुरू होणार आहे. तर कॉल सेंटर मधुन म्हणजे त्यांचे जे नंबर आहेत कॉल सेंटरचे तक्रार निवारणाकरीता कॉल सेंटर असेल. तर कॉल सेंटर मध्ये त्या तक्रारी स्विकारल्या जातील . तक्रारी स्विकारल्यानंतर ४८ तासांच्या आंत त्यांना ते पथदिवे चालु करायचे आहेत. जर त्यांनी ४८ तासांच्या आंत पथदिवे जर चालु नाही केले. तर त्यांच्यावर आपल्या द्विपक्षीय करारनाम्यामध्ये नमुद असल्याप्रमाणे , अटी शर्ती मध्ये असल्यानुसार त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. ज्या परिसरामध्ये समजा मोठ्या प्रमाणात सलग पथदिवे बंद असतील किंवा त्यांच्या तांत्रिक कारणामुळे आणि त्यांनी ते काम जर नाही केले तर त्या संदर्भात सुध्दा आपली दुसरी दंडात्मक कारवाई आहे तर त्या अनुषंगाने त्यांची जी बिलाची रक्कम असेल त्याच्यानुसार आपण त्यांच्या बिलाच्या रकमतुन ती रक्कम वजा करू. अश्या पध्दतीने आपण त्यांच्याकडुन करणार आहोत आणि मेंटेनंन्स चे काम त्यांचे सद्या चालु आहे. महावितरण कंपनीकडुन आपल्याला सद्या आपण मेंटेनंन्स चे काम करताहेत. महावितरण कंपनीचे सद्या त्यांचे वसुलीचे काम असल्यामुळे आणि त्यांच्या मेंटेनन्स चे काम असल्यामुळे आपण ते काम असल्यामुळे आणि त्यांनी आपल्याला कर्मचारी उपलब्ध न करून दिल्यामुळे मेंटेनन्सच्या कामाचा जो आपला स्पिड आहे. तो आपला ह्या मध्यंतरीच्या काळामध्ये आपला थोडासा कमी झाला होता.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मग तोपर्यंत लोकांनी अंधारातच राहायचे का ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** नाही , नाही आपण अंधारात राहण्याचा विषय नाहीये. आपण त्यांना पाठपुरावा आपण करतो आहे आणि पार्शनल कंम्पिलीशन आपण त्यांना पुढच्या आठवड्यात दिल्यानंतर ते झाल्यानंतर १०० टक्के ते पुर्ण बंधनकारक होवुन जाईल . त्यांना ते काम करावच लागेल. ते काम त्यांनी कोणत्याही पध्दतीने करावं. समजा महावितरण कंपनीचे कर्मचारी जरी त्यांना मिळाले नाही तर ते कसे चालु करायचे याची जबाबदारी आपण त्यांच्यावर निश्चित करणार आहोत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण साहेब नागरीक ऐकायच्या परिस्थितीत नसतात ना, नागरीकांना तर आता आम्हाला तोंड द्याव लागत ना. एकतर पावसाळ्याचे दिवस आहेत. चोऱ्या होत आहेत. जर अश्या याच्यामध्ये १०-१० , १५-१५ दिवस महिना महिना , दोन दोन महिने बंद राहतील तर कसे , नागरीक कसे सहन करतील उत्तर आम्हाला द्यावे लागते ना.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** याच्यासंदर्भात म्हणजे पथदिवे चालु करण्याच्या संदर्भात आपण १०० टक्के आपण कारवाई करू. दुसरी गोष्ट आपण मध्यंतरी महावितरण कंपनीचे ही संबंधित युनिट अधिकारी , अभियंत्यांकडून सहकार्य न मिळाल्यामुळे आपण याच्यासंदर्भात मी परवाच त्यांचे जे एक्झिक्युटिव्ह इंजिनियर आहेत त्यांची भेट घेवुन याच्या संदर्भात मी त्यांना विनंती केलेली आहे , की तुम्ही तुमचे कर्मचारी जे आहेत कसे आहे की काही फॉल्ट झाल्यानंतर लाईनवरचा फॉल्ट शोधायची जबाबदारी महावितरण कंपनीची आहे. कारण की, लाईनवर आपल्याला काम करता येत नाही. लाईनवरचा फॉल्ट त्यांनीच काढायचा आहे. आपले कमचारी फक्त त्यांच्या सोबत असतात. परंतु त्यांच्याकडुन कर्मचारी न मिळाल्यामुळे काही फॉल्ट जर झाला तर ते सल्लग ३० ते ४० लाईट बंद असतात. आणि याच्या संदर्भात आपण त्यांच्या हायर अथॉरिटीशी जे आहे त्यांच्या एक्जीकेटीव्हशी आपण चर्चा केलेली आहे. आणि त्यांना सांगितले की, तुम्ही कर्मचारी द्या. आणि त्यांनी आपल्याला आश्वासन दिलेल आहे. कार्यकारी अभियंतांनी की, आम्ही तुम्हाला कर्मचारी उपलब्ध करुन देऊ. आणि याच्या संदर्भात जे आहे बंद पथदिवे चालु करायच्या संदर्भात विभागामार्फत काही ठोस कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, साहेब.

**मा.सभापती :-** भाऊ एकच मिनीट, सर्व प्रभागाचे लाईट इन्स्पेक्टर जे असतील. यांनी आपआपल्या प्रभागातील सर्व्हे करावे कुठले कुठले लाईट बंद आहे. हे सर्व्हे करुन आठ दिवसाच्या आत संपुर्ण लाईट बदलविण्याच काम करण्यात याव.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब, साहेब माझे एक म्हणणे आहे. आता के.सी.पार्क ते लक्ष्मीनगरच्या कोपऱ्यापर्यंत त्या बी.एन्ड सी वाल्यांनी काम केले. साहेब आपले ७० पोल उभे केले होते ईलेक्ट्रीकचे, त्यांनी रोड खोदला, नाला खोदला, आपले काही पोल वाकडे होऊन गेलेले आहे. जर ते पोल पाऊसाळयात पडले नाल्याच्या पाण्यामुळे तर तेथे किती जिवीत हानी होईल लोकांची, ती पाहणी केली का तुम्ही. के.सी.पार्क ते जुना कानळदा रोड, आपला जुना नाका, लाकुडपेठचा कोपरा,

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आपण जे काम केलेल आहे, आपण काम केल्यानंतर ती पुर्ण यंत्रणा जी असते ती पुर्ण महावितरण कंपनीच्या अधिपत्या खाली जाते. त्याच्या संदर्भातला मेनटेनन्सच जे काम आहे ते महावितरण कंपनी मार्फतच करण्यात येईल. याच्या संदर्भात आपण महावितरण कंपनीला पुन्हा एकदा सुचना देऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** चार ते पाच पोल पडुन जातील साहेब तेथे. दिवसरात्र ट्रॅक्टर चालतात तेथे रेतीचे.पुर्ण लाईन खचुन घेऊन जाईन तेथे तुम्ही लवकरात लवकर लक्ष द्या. आणि चौथा विषय असा की, आमदार निधीतुन आपण हायमास्ट लाईट लावले होते सर्व प्रभागांमध्ये, ते हायमास्ट लाईट आता दिड वर्षापासुन आता बंद आहे. काही प्रभागांमध्ये त्याची रिपेरिंगची व्यवस्था कशी आहे तुमच्याकडे,

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आपण आपले जी आमदार निधी मधुन एल.ई.डी. पथदिवे बसविलेले आहे. त्याच्या मेनटेनन्सचा जो विषय आहे आपण आपल्या स्तरावर ते करणार आहोत. आणि आपण ते काम करत आहोत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हायमास्ट लाईट, हायमास्ट लाईट.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** हायमास्टवरचे जी एल.ई.डी.लाईट आहे आणि ते एल.ई.डी. लाईटाचा मेनटेनन्स जे आहे ते आपल्या विभागामार्फतच करण्यात येईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब दिड दिड वर्ष झाले बंद आहे ते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब दिड दोन वर्षापासुन बंद आहे ते. आम्ही लावण्याच्या पहिले सांगितले होते की, याचे लाईट बिल कोण भरणार. आणि बंद झाल्यावर सुधरविन कोण असे आम्ही मागील सभेमध्ये बोललो होतो. लावायच्या पहिले. आता वापस तोच प्रश्न उपस्थित राहिला. ते लाईट सगळे बंद आहे प्रभागामध्ये मोठे मोठे. चौकातले मेन चौकातले.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** हायमास्ट पोलवरचे जी काही लाईटे बंद असतील. ते तात्काळ आपण रिपेअर करु आणि दुरुस्त करु.

**श्री.प्रशांत नाईक :-** पाटील साहेब.

**श्री.नितीन बरडे :-** पाटील साहेब, प्रभागातले,

**श्री.प्रशांत नाईक :-** पाटील साहेब. प्रभागातले आमदार निधीतुन जे पोल उभे केलेले आहे. दोन दोन वर्ष झाले एल.ई.डी.लाईट बंद आहे. तुम्ही सांगतात की, ते आमदार निधीमधील आहे ते आपण बदलु शकत नाही.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आमदार निधी मधील जी हायमास्ट आहे त्याचे पथदिवे आपल्यालाच रिपेअर करायचे आहे. आणि त्याच्यानुसार आपण रिपेअर करत आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब मग आमच्या प्रभागातले चार आहे ते का बंद आहे दोन वर्षापासुन.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** जे काही बंद असतील. त्याची माहिती घेऊन लवकरच त्याच्या दुरुस्तीच्या संदर्भात आपण कार्यवाही करु.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब मी स्वत: तुम्हाला फोन केलेला आहे की, आमदार निधीतले ५ पोल बंद आहे म्हणुन टोटली बंद आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आपण याच्या संदर्भात कार्यवाही करु.

**मा.सभापती :-** पाटील साहेब, सर्व सन्मा.सदस्यांच्या ज्या समस्या आहे.

**श्री.नितीन बरडे :-** राजु भाऊ, राजु भाऊ एकच मिनीट एकच मिनीट थांबा. पाटील साहेब तुमचे माणसे येत नाही आणि निरोप ही देत नाही की, गाडी आहे की काय आहे. तुमच्या घरासमोर किती दिवस लाईट बंद राहतो. तुमच्या घराच्या आजु बाजुला किती एल.ई.डी. आहे. तुम्ही माझ्या प्रभागातच राहतात. तुमच्या घरासमोरचा लाईट गेला म्हणजे एका तासात दुरुस्त होतो. नागरीकांच्या घरासमोरचा का होत नाही.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** असे कुठेही काही नाही. आता गेल्या या आठवडयामध्ये महावितरण कंपनीच्या फॉल्ट मुळे माझ्या घराकडची लाईट ३ दिवस गेलेली होती.

**श्री.नितीन बरडे :-** तुमच्या घरासमोर एल.ई.डी. लागलेले आहे तुमच्या घरासमोर साधे टी-५ पण लागले नाही.

**मा.सभापती :-** भाऊ तुमचाच प्रभाग चमकतो आहे.

**श्री.नितीन बरडे :-** म्हणुन सांगतो आहे. त्यांच्याच घरासमोर आहे. ६ एल.ई.डी. आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** असे कुठेही नाही. माझ्या घराच्या समोर फक्त दोनच लाईट आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आमदार निधीतील हायमास्ट लॅम्पचा कमिशन तुम्हाला चांगला भेटतो. त्यामुळे हायमास्ट लावायला पहिले गाडी देतात. तयार होतात. दुरुस्तीला तयार होत नाही तुम्ही.

**मा.सभापती :-** सर्व सन्मा.सदस्यांचे ज्या लाईटाबाबत समस्या आहेत. आठ दिवसात विभाग प्रमुखांनी सोडवायचे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** राजु भाऊ मला आरोग्य विभागाशीही बोलायचे आहे. आरोग्य विभाग, पाणी पुरवठा विभाग आणि बांधकाम विभागाशीही बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** मग कोणाशी बोलायचे आहे ?

**श्री.नितीन बरडे :-** आरोग्य विभाग.

**मा.सभापती :-** या पाटील साहेब.

**श्री.नितीन बरडे :-** पाटील साहेब, १५ दिवस झाले घंटागाडया बंद आहे. सार्वजनिक शौचालय साफ होत नाही. तुम्हाला वारंवार फोन केलेले आहे.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** समता नगरचा जो टॉयलेटचा प्रॉब्लेम होता ना. तो जेटींग मशिनद्वारे साफसफाई करुन क्लियर करण्यात येत आहे. समता नगरच्या तेथे जी एक टॉयलेट आहे ना. त्या बऱ्याच नागरीकांनी अनाधिकृत जोडण्या केलेल्या आहे. पहिले तेथे मोठी टँकर जात नव्हती. परंतु आता मलेरिया विभागातुन आपण जो जेटींग दिलेले होते. ते ताब्यात घेतलेले आहे. त्या जेटींगच्या आधारे आज त्या एक टॉयलेटची साफसफाई करण्यात येईल.

**श्री.नितीन बरडे :-** ती एक शौचालय झाली बाकीच्या काबरं होत नाही. जेथे गाडी जाते तिथे. ठेक्यात काय लिहलेले आहे. दोन टाईम सफाई आहे की, एक टाईम सफाई आहे.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** नाही, दोन टाईम सफाई आहे त्याच्यात.

**श्री.नितीन बरडे :-** अरे दोन टाईम दिलेली आहे तर एक दिवसा आडतर सफाई करा.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** नाही, असे होत नसेल तर माहिती घेतो.

**श्री.नितीन बरडे :-** घंटागाडी किती दिवस झाले बंद आहे. घंटागाडया १५ दिवस झाले बंद आहे, दंड टाकत आहे का तुम्ही.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** हो जिथे जिथे घंटागाडया बंद आहे तेथे तेथे दंड टाकत आहोत.

**श्री.नितीन बरडे :-** दंड लागत आहे.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** हो रेग्युलरली दंड होत जिथे जिथे घंटागाडया बंद आहे तेथे.

**श्री.नितीन बरडे :-** तुम्ही तपास करा आजचा, आज घंटागाडया नाही.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** हो.

**श्री.नितीन बरडे :-** आजचा तपास करा तुम्ही, आठ दिवस झाले फिरतो आहे मी, घंटागाडयांमागे.

**मा.सभापती :-** ठिक आहे, तपास करतील भाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** पाणी पुरवठा अभियंत्यांना बोलवा.

**मा.सभापती :-** या साळुंखे साहेब.

**श्री.नितीन बरडे :-** साळुंखे साहेब, रात्री १२.३० वाजता फोन केला होता मी तुम्हाला.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** बरोबर.

**श्री.नितीन बरडे :-** २.०० वाजता फोन उचलला नाही तुम्ही रात्री.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** बरं.

**श्री.नितीन बरडे :-** समता नगर, स्टेट बँक कॉलनी याचा सप्लाय केव्हाही रात्री व्हायला नको.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** नाही नाही, तांत्रिक अडचण होती, मेन टाकीचा व्हाल बसवत होते.

**श्री.नितीन बरडे :-** काल ४.०० वाजेपर्यंत मी जागी होतो. मी ४.०० वाज्यापासुन जागी आहे. तुमच्या कर्मचाऱ्यांना स्लम भागात मारत होते. मी वाचविले आहे रात्री.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** मान्य आहे. आपण तो प्रयत्न केला ही होता आणि पाणी पुरवठा सुरळीत केल्यानंतर, या समता नगर भागात पुरवठा करणारा व्हाल खराब झाल्यामुळे तो विलंब झालेला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आहो. समता नगर मध्ये गुन्हेगारी वृत्तीचे मुले आहे.चाकु सुऱ्या घेऊन आले ते. तुमच्या कर्मचाऱ्यांना काही झाले असते तर त्यांच्या घरची जबाबदारी तुमच्या प्रशासनाने घेतली असती का ?

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** यापुढे समता नगरमध्ये दिवसात सप्लाय करण्यात येईल यासाठी दक्षता घेण्यात येईल.

**श्री.नितीन बरडे :-** किती वेळा झाले, वर्षानुवर्ष तेच चालु आहे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** हे बघा, तांत्रिक अडचणमुळे हे झालेले होते. आणि काल मी सभापती महोदयांकडे बसलेलो असतांना त्यांना तशी सुचना दिलेली होती की, असे असे झालेले आहे त्यामुळे पाणी पुरवठा उशिरा चालु आहे.

**श्री.नितीन बरडे :-** रात्र रात्रभर ४.०० वाज्यापर्यंत सप्लाय चालला तो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** २-२ व ३-३ वाजता नागरीक कसे पाणी भरतील. त्यांना माहित कसे पडणार.

**श्री.नितीन बरडे :-** मी स्वत: फिरत आहे रात्री. तुमच्या व्हालमनला विचारा. रात्रभर त्यांच्या बरोबर फिरलो आहे मी.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** संबंधीत शाखा अभियंतांना सुचना देण्यात येतील. आणि या पुढे ही दक्षता घेतली जाईल.

**श्री.नितीन बरडे :-** तुम्ही पहा ते नेहमी तुमचा तो प्रॉब्लम राहतो. पंप बंद राहतो. कुठे काही बंद राहतो.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** पहा, तांत्रिक अडचण आली तरच प्रॉब्लम येतो नाही तर काही अडचण नसते.

**श्री.नितीन बरडे :-** तुमच्या दोन्ही कर्मचाऱ्यांचे रात्री कमी जास्त होऊन गेले असते तर तुम्ही काय केले असते.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** ठिक आहे या पुढे दक्षता घेऊ.

**श्री.नितीन बरडे :-** राजु भाऊ हे अमृतच काम करत असतांना हे कोण आहे रस्ते दुरुस्तीला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बाबा थांबा, बाबा एक मिनिट बाबा. बाबा मी म्हटले जिल्हापरिषद चौकातल्या. आता ज्या लाईन अमृतवर शिफ्ट झालेल्या आहे. त्या जुन्या लाईन काढण्याची जबाबदारी कोणाची आहे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** आपली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग ती केव्हा काढली जाईल.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** आता एक १५ इंची लाईनच काम आज चालु केलेले आहे सकाळ पासुन ती अजुन १५ इंची कट केलेली नाही तीला एन्ड प्लग मारलेला नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना साधारणता मी जवळपास १० दिवसापासुन मी बघत आहे की, त्या एन्ड कॅप मारण्याची बाकी आहे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** आज काम सुरु आहे. त्याला काय करता येते. तेथे दोन दिवस पाणी असतं. दोन दिवस काम नाही होत. ज्या दिवशी गावातला सप्लाय नाही होत त्याच दिवशी तेथे काम करता येतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु त्यात थोडुशे लक्ष घालुन ती एन्ड कॅप मारुन जी दोघी बाजुची लाईनी आहे. एक शामा प्रसाद मुखर्जी उद्यान कडची आणि दुसरी जिल्हा परिषदेच्या बाजुची. या दोघी लाईन काढल्या गेल्या ना. तर कमीत कमी आमचा ते ड्रेनेजला प्रॉब्लम होतो. कारण त्या ड्रेनेजच्या मधुन गेलेल्या लाईनी आहे त्या. आणि त्यामुळे चौकातला जो विषय आहे ना. चौकातली लाईन जो पर्यंत काढली जात नाही. तो पर्यंत त्या शिवाजीनगरच्या पुलाच्या कॉंक्रीटीकरणचा खालचा बेस सुरु होत नाही.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** भाऊ त्याच्यासाठीच १५ इंचीच काम हाती घेतलेले आहे. मागच्या वेळेस पाऊस आल्यामुळे ते काम बंद राहिले. आणि तेथे आठवडयातुन दोनच दिवस काम करता येते ही अडचण आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही तर पुढच्या ४ दिवसात ती लाईनी डिस्कंटीनिव्ह होतील का ?

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** आज १५ इंचीचे काम होईल त्याच्यानंतर मधला जो भाग आहे. गॅपच्या मध्ये तर त्यांचे कॅम्पस मधल्या लाईनी काढण्यात येतील. नंतर बाहेरचे काम होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे थोडे प्राथमिकतेने लावा.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** हो चालेल.

**श्री.नितीन बरडे :-** राजु भाऊ, राजु भाऊ.

**श्री.प्रशांत नाईक :-** मला बाबा साळुंखेंना प्रश्न विचारायचे आहे.

**श्री.नितीन बरेडे :-** राजु भाऊ आपली अमृतची चारी.

**श्री.प्रशांत नाईक :-** नितीन भाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** एक मिनीट प्रशांत. आपल्या अमृतच्या चाऱ्या दुरुस्त करायला कोण अधिकारी आहे संबंधीत.

**मा.सभापती :-** अमृतचे कोण आहे.

**श्री.नितीन बरडे :-** कोण साहेब आहे. लुले साहेब, कधी स्टेट बँक कॉलनीच्या उतरतीच्या रस्त्यावर गेले आहे का तुम्ही.

**श्री.गोपाल लुले :-** मग गेलेलो आहे.

**श्री.नितीन बरडे :-** केव्हा गेले होते.

**श्री.गोपाल लुले :-** दोन तीन महिन्यापुर्वी गेलेलो होतो.

**श्री.नितीन बरडे :-** दोन तीन महिन्यापुर्वी ते खोदलेले नव्हते. ते दिड महिन्यापुर्वी खोदले गेलेले आहे. सर्व उतरतीचे रस्ते आहे. तेथे नागरीकांना एकच रस्ता आहे यायला. तो रस्ता कधी दुरुस्त होणार आहे आणि ते खडे कधी साफ होणार आहे. नागरीकांचे हात पाय मुडल्यावर.

**श्री.गोपाल लुले :-** एक दोन दिवसात चालु करायला लावतो. खडीकरण करायला लावतो.

**श्री.नितीन बरडे :-** आणि आपल्या प्रोव्हीजन मध्ये आडव्या चाऱ्या दुरुस्त करायचे आहे की नाही. कनेक्शन दिलेले आडव्या चाऱ्या दुरुस्त करायचे आहे की नाही.

**श्री.गोपाल लुले :-** कनेक्शन चाऱ्या जरी नसली प्रोव्हीजन, तरी आपण मक्तेदाराकडुन संबंधीतांकडुन ते करुन घेतो आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मग का केली जात नाही. तुम्ही बघा बरं त्या आडव्या चाऱ्या दुरुस्त केल्या का ?

**श्री.गोपाल लुले :-** केल्या जातात.

**श्री.नितीन बरडे :-** त्या पोस्टल कॉलनीत काँक्रीट रस्ता दुरुस्त झाला तेथे दोन तीन चाऱ्या सोडुन दिल्या. तिथे पडले लोकं. आणि काँक्रीट रस्ता झाल्यानंतर तेथील खडे साफ व्हायला पाहिजे की नाही.

**श्री.गोपाल लुले :-** हो चालु होते परवा तेथे.

**श्री.नितीन बरडे :-** नागरीकांच्या गाडया स्लिप होत आहे तेथे.

**श्री.गोपाल लुले :-** परवाच्या दिवशी गेलेलो होतो. साफसफाई चालु होती. राहिलेले असेल तर करुन घेतो.

**श्री.नितीन बरडे :-** हे स्टेट बँक कॉलनीचे ही सर्व करुन द्या. उतरतीचे ही सर्व रस्ते दुरुस्त करुन द्या.

**श्री.गोपाल लुले :-** हो हो.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती महोदय, सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला प्रशांत भाऊ.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती महोदय, बाबा साळुंखेशी बोलायचे आहे. साळुंखे साहेब आपली जी १२०० लाईन टाकनी चालु आहे तिचे काम का बंद आहे ?

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** एम.एस.चे जी पाईप आहे तीचे फेब्रीकेशनची ऑर्डर दिलेली आहे. परंतु पुरवठादाराकडुन, हे दिले गेलेले आहे कार्यादेश पण पाईप अजुन साईटवर उपलब्ध झालेले नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** किती दिवस झाले कार्यादेश देऊन.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** कार्यादेश देऊन तर जवळपास तीन महिने झाले.

**श्री.प्रशांत नाईक :-** मग,

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** त्याचे एक्सट्रा आयटम मंजुर केलेले आहे आपण.

**श्री.प्रशांत नाईक :-** ते एक्सट्रा आयटम मंजुर करायला आपल्याला २ वर्ष लागले. बरोबर आहे का ?

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** नाही, ते नाही सांगु शकत.

**श्री.प्रशांत नाईक :-** मंजुर करुन ही आपल्याला ३ महिने झाले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** साहेब एम.जी.पी.देणार आहे की काय ? साहेब एम.जी.पी. देणार आहे की, पुरवठादार देणार आहे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** पाईप आपल्याकडुन मक्तेदारामार्फत घेण्यात येत आहे. आणि तो एक्सट्रा आयटम झाल्यामुळे, त्याला एक्सट्रा आयटम म्हणुन रितसर मान्यता घेऊन मक्तेदारास तसे पत्र देण्यात आलेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ, नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्यता घेतली आहे का ?

**श्री.प्रशांत नाईक :-** मान्यता घेतलेली आहे नितीन भाऊ, हे विषय असा होता की, यांनी पहिले सांगितले की, एम.जी.पी. मटेरिअल पुरविणार आहे आपल्याला आता पर्यंत असे सांगत होते. त्यांच्या मागे लागुन लागुन त्याच्यानंतर त्यांनी काय केले मग, आयुक्त साहेबांची मान्यता घेतली. जिवन प्राधिकरण व आपले सर्व अधिकारी

बसुन मान्यता घेतली, मक्तेदाराला ऑर्डर पण दिल्या. ३ महिने झाले अजुन ही ते मटेरिअल येत नाही. १२०० चा, त्याच्यामुळे सर्व कामे बंद पडलेले आहे १२०० लाईन पुर्ण झालेली आहे आपली. गिरणा टाकी ते कस्तुरी हॉटेल पर्यंत.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** दोन विषय तुम्ही मिक्स करत आहे. जी.आय.पाईप एम.जी.पी. कडुन घ्यायचे आहे आणि एम.एस. आणि इतर फेब्रीकेशन हे आपला जो मक्तेदार रितसर नियुक्त आहे त्याच्याकडुन घ्यायचे आहे. आणि जी.आय. पाईपचा K९ आणि K७ चा वाद होता. आपण एम.जी.पी.कडे पैसे पुर्ण भरलेले आहे. परंतु तो शॉर्ट सप्लाय झालेला आहे. आणि त्या स्तरावर शासनाचा अंतिम निर्णय झालेला असुन लवकरच पुरवठा करण्यात येईल. मेम्बर सेक्रेटरी व चिफ इंजिनियर यांच्या समोर हा विषय मान्य झालेला आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब ती आपली १२०० ची लाईनचे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** तेच सांगत आहे ना मी. आपल्याकडे एम.एस.ची लाईनचे फेब्रीकेशनचीच अडचण आहे. बाकी विषय काही नाही. ते एल.आर.सगळे झाले, ई.आर.आर. सगळे झालेले आहे ते मान्य झालेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** मग आता कुठे काम अडकलेले आहे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** फक्त एम.एस.पाईपचा पुरवठा मक्तेदाराने ऑर्डर दिली आहे. त्याचा पुरवठा या आठ दिवसात व्हायला पाहिजे.

**श्री.प्रशांत नाईक :-** म्हणजे १० दिवसात काम चालु होऊ शकतो आपला.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** हो हो.

**श्री.प्रशांत नाईक :-** कारण कस्तुरी हॉटेल जवळ ही फोरवेच काम चालु झालेल आहे. तिथे ही जोडणी करायची आहे आपल्याला १२०० ची लाईन.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** हो हो, तिचा ही एल.आर. केलेला आहे. या एम.एस. पाईपाबरोबर तेथील पाईप येणार आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** कारण ते मेहरुण बुरुज आणि महादेव मंदिराकडचे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** ते सगळे त्याच्यातच आहे एम.एस.पाईप.

**श्री.प्रशांत नाईक :-** म्हणजे दहा एक दिवस लागतील का काम सुरुव्हायला.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** हो हो.

**मा.सभापती :-** मला वाटते मेहरुण बुरुजाजवळचा विषय जो आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** एक मिनिट एक मिनिट, याच विषयाशी संबंधीत आहे. त्या बुरुजाजवळ आपल्या दोन डिप्या टाकल्या गेल्या आहे नविन.

**श्री.प्रशांत नाईक :-** बरोबर, बरोबर.

**मा.सभापती :-** आता ते आपल्याला शिफ्ट करायला लागणार आहे. त्याच्यासाठी काही केले का आपण काही प्रोव्हीजन ?

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** लाईट विभागामार्फत कार्यवाही चालु आहे. अंदाजपत्रक बनविण्यात आलेल आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** राजु भाऊ.

**मा.सभापती :-** हा बोला.

**श्री.प्रशांत नाईक :-** हे त्या डिप्या शिफ्ट करायच्या होत्या आपल्याला. तेथे डिपी पण आहे. असे तिन डिप्या नडत आहे आपल्याला १२०० च्या लाईनला.

**मा.सभापती :-** हो दोघी बाजुने दोन आहे आणि एक साईडला एक.

**श्री.प्रशांत नाईक :-** ऐकुन तर घ्या. हे ४ महिने झाले. आपण प्रोसेस ऐकत आहोत. आयुक्त सुध्दा पाहणी करुन गेले. बाबा साळुंखे येऊन गेले. नितीन भाऊ आणि आम्ही स्वत: चर्चा केली श्री.एस.एस.पाटील साहेबांशी. त्यांचा पत्र व्यवहारच चालु आहे.

**मा.सभापती :-** ह्या ज्या डिप्या आहेत, त्या काही आधी नव्हत्या. या वर्ष भराच्या आत मला वाटते, आठ दहा महिन्यापुर्वी टाकलेले आहे. आणि आधी डि.पी.आर. झालेला आहे सर्व.

**श्री.प्रशांत नाईक :-** बरोबर बरोबर.

**मा.सभापती :-** आपला प्लॅन आधीचा मंजुर आहे. तर ते टाकतांना त्याच्याशी संबंधीत जे ईलेक्ट्रीक डिपार्टमेंट आहे. त्यांनी आपली परमिशन घेतलेली नव्हती का ? जागा निश्चित करतांना.

**श्री.प्रशांत नाईक :-** राजु भाऊ यांच लक्षच नसते या गोष्टींवर, यांना जेथे पैसे मिळतील तेथे लक्ष असते.यांनी शिरसोली नाका डि-मार्ट जवळ आहे ना. तसेच डिप्या टाकुन ठेवलेल्या आहे रस्त्यामध्ये आपण लाखो रुपये खर्च केले शिफ्टींगसाठी आणि त्या ठिकाणी यांनी अजुन दोन नविन डिप्या टाकुन ठेवल्या रस्त्यावर. यांचा प्रकरण पहा तुम्ही केवड मोठ आहे. कालच वाद झाला त्या गोष्टीवरुन नितीन भाऊ. त्याच विषयाला अनुसरुन विषय आहे हा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो हो. बरोबर आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** यांच तेथे लक्ष नसते.

**मा.सभापती :-** आता पाईप आल्यानंतर त्या डिपीचा प्रश्न प्रलंबीत राहायला नको. त्याच्या शिफ्टींगसाठी आपण लवकरात लवकर प्रयत्न केले पाहिजे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** लाईट विभागाकडे याचा पाठपुरावा केलेला आहे. त्यांनी एम.एस.ई.बी. कडे १.३ साठी पत्र ही दिलेले आहे. आणि अंतिम टप्यात आहे मला वाटते ते काम.

**श्री.प्रशांत नाईक :-** साळुंखे साहेब, अंतिम टप्यात नाही. त्याच्या क्युऱ्या निघाल्या आहे. एस.एस.पाटील साहेब समोरच बसले आहे विचारा त्यांना, कालच एस.एस.पाटील साहेबांशी बोलणे झाले आमचे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** ठिक आहे जर बोलण झाल तर माहित आहे ना आपल्याला.

**श्री.प्रशांत नाईक :-** कालच विषय झाला, आम्ही ते चेतन सोनवणे साहेबांना बोलविले तेथे. अंतिम टप्यात नाही बारे.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** भाऊ. तो विषय मला माहित नव्हता, आपण त्याची माहिती घेतलेली आहे म्हणुन मला माहित नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** तुम्ही सांगत आहे ना की, अंतिम टप्यात आहे. तर आम्हाला आनंद होऊन जाईल की, अंतिम टप्यात आहे. आम्हाला माहित आहे की, कोणत्या टप्यात आहे ते काम.

**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा अभियंता :-** ठिक आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय, सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हा, बोला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय, दि.१२/०५/२०२१ चा एक ठराव झाला आहे, ठराव क्र.४९८ चा, जळगांव शहरासाठी दोन जेटींग मशिन खरेदी करणेबाबत, तो कुठपर्यंत आला विषय, जळगांव शहराचा जेटींग मशिन हे महत्वाचा विषय आहे आरोग्यसाठी,

**मा.सभापती :-** जेटींग मशिन आल्या आहे वाटते,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही, त्या १७ मजलीसाठी आलेल्या आहेत लहान. या मोठया जेटींग मशिन आहे शहरासाठी.

**मा.सभापती :-** या भामरे माहिती द्या. वाहन विभाग.

**श्री.गोपाल लुले, वाहन विभाग प्रमुख :-** जेटींग मशिनच्या बाबतीत जो ठराव आला तो पुर्वी भांडार विभागाकडे गेला होता. भांडार विभागाकडुन तो वाहन विभागाकडे आला, वाहन विभागाकडे आल्यानंतर मी जेटींग मशिनबाबत गोसावी साहेबांशी संपर्क साधला, त्यांनी मला असे सांगितले की, त्या ४ जेटींग मशिन आपण खरेदी केल्या. त्या ४ जेटींग मशिन माझ्या माहिती प्रमाणे मेन्युअल ऑपरेटेड आहे. आणि ह्या व्हिकल ऑपरेटेड असल्यामुळे याची कार्यवाही सुरु आहे. फक्त जेटींग मशिनचा ठराव झालेला आहे पण त्याची खर्चाची तरतुद कश्या मधुन करायची या बाबतीत मी वरिष्ठांशी विचारपुस केली, या बाबतीत अजुन ही मार्गदर्शन काही मिळाले नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आहो, साहेब, तुम्ही जे सांगत आहे गलत सांगत आहे. ४ जेटींग मशिन नाही घेतल्या, २ लहान्या जेटींग मशिन १७ मजलीसाठी ज्या दिवशी मी विषय उचलला त्याच्या दुसऱ्या दिवशी उपलब्ध झाल्या. आणि ह्या जे २ जेटींग मशिन मोठया आहे. ह्या जे जळगांव शहराच्या टॉयलेट, मुताऱ्या चॅकअप होतात. त्यासाठी आपण मोठया मशिन मागवत आहे. याची पुर्तता सांगत आहे तुम्ही ४ मशिन लहान्या सांगतात. लहान नाही. जे २ आणल्या आहेत त्या १७ मजलीसाठी आणल्या होत्या. ह्या २ बाहेरच्या आहे.

**श्री.गोपाल लुले, वाहन विभाग प्रमुख :-** २ जेटींग मशिनच्या बाबतीत मी पोर्टलवर तपास केले, मी बघितले जी.एम.पोर्टलवर. रु.२० लाखापासुन तर जवळ जवळ रु.६० लाखापर्यंत आहे. आता कोणत्या घ्यायच्या त्याच्यावर मी परत प्रस्ताव तयार करत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** निधी कोणता, निधी आहे का ?

**श्री.गोपाल लुले, वाहन विभाग प्रमुख :-** निधी उपलब्धतेबाबतच मी गोसावी साहेबांशी बोलणे केले होते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मग तसे तुम्ही पत्राचे उत्तर पण दिले नाही आणि सांगत पण नाही की, निधी शिल्लक नाही की काय आहे. मग आम्ही नुसते वेडयासारखे ठराव करायचे. आणि त्याचा पाठपुरावा व्हायचे नाही. मग ते कुठ पर्यंत पडली आहे ती फाईल.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ, संबंधीत अधिकारी जे आहे त्यांच्याशी आपण वाटल्यास आपण आपल्या कॅबीन मध्ये त्यांना बोलवुन सविस्तर माहिती घेऊ आणि पुढच्या सभेमध्ये काय विषय असेल ते आपल्याला मांडता येईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सदरचा प्रस्ताव तहकूब करण्यात येत असून मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांची स्थायी समिती ठराव क्रं.२६० दि.२५/०८/२०२० मंजूरी अन्वये दरमहा रु.१४,०००/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची मुदत दि.२४/०८/२०२१ रोजी संपत असून उक्त मानसेवी कामगार यांना शासन निर्णयानूसार समान काम समान वेतन याप्रमाणे वेतन मिळणे आवश्यक असल्याने सदर कर्मचाऱ्यांना त्यानूसार वेतन देणेकामी प्रशासनाने प्रस्ताव तयार करुन दि.२४/०८/२०२१ पुर्वी स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी सादर करावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**